रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १०६
www.ramprahar.com
शुक्रवार, १ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

शुभ दीपावली

## अंतरंग
खारघरमधील ड्रग्स पार्टीचा बेत पोलिसांनी उधळला/३
माथेरानमध्ये हातरिक्षा ओढताना चालकाचा मृत्यू/५
आयपीएलसाठी खेळाडूंची रिटेंशन यादी जाहीर/८

## पंतप्रधान मोदींची जवानांसोबत दिवाळी



**गुजरात** : पंतप्रधान नरेंद्र मोदी जवानांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी गुजरातच्या कच्छमध्ये पोहचले होते. गुजरातमधील कच्छमध्ये पंतप्रधान मोदींनी दिवाळीनिमित्त सैनिकांना प्रोत्साहन दिले. त्यांनी सैनिकांशी संवादही साधला, त्यांची विचारपूस केली. दरम्यान, भारत आणि चीनच्या सैनिकांनी दिवाळीनिमित्त एकमेकांना मिठाई वाटून आनंद साजरा केला. याच्या एक दिवसआधीच दोन्ही देशांच्या सैन्याने एलएसीवरून आपल्या चौक्या मागे घेतल्या होत्या. गुरुवारी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेसह अनेक सीमेवर मिठाईची देवाण-घेवाण झाली.

# काँग्रेसचे प्रमुख नेते लवकरच भाजपत -उपमुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीदरम्यान मुंबई महापालिकेतील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी पक्षाच्या सदस्यत्त्वाचा राजीनामा देत गुरुवारी (दि.३१) भाजपमध्ये प्रवेश केला. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, काँग्रेसचे प्रमुख नेते पुढच्या काळात भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत, असा दावा केला.

रवी राजा यांना सायन कोळीवाडा येथून उमेदवारी हवी होती, मात्र काँग्रेसने गणेश यादव यांना उमेदवारी दिली. त्यामुळे नाराज झालेले रवी राजा यांनी भाजपत प्रवेश केला. रवी राजा यांनी मुंबई महापालिकेत विरोधी पक्षनेतेपद भूषवले. ते तीन दशकांहून अधिक काळ काँग्रेसमध्ये होते. काँग्रेसला कोल्हापूरमध्येही मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या विद्यमान आमदार जयश्री जाधव यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे. मुंबईत रवी राजा यांच्या पक्षप्रवेश झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, रवी राजा यांच्यासारखा मातब्बर नेता, ज्यांनी मुंबई महापालिका गाजवली, पाच टर्म महापालिकेत निवडून आले. २३ वर्षे त्यांनी बेस्टचे सदस्य म्हणून काम केले. जनसंपर्क असलेला नेता आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा भाजपला मिळेल. रवी राजा यांच्या माध्यमातून आमच्या संपर्कात अनेक लोक येत आहे. भाजपत येत्या काही दिवसांत मोठे पक्षप्रवेश होतील. काँग्रेसचे ते नेते कोण हे मला विचारू नका. महायुतीचे सरकार हे सत्तेत येणार आहे. महायुतीसंदर्भात सकारात्मकता पाहण्यास मिळत आहे. नामांकन पूर्ण झाले आहे. त्यानंतर काही ठिकाणी क्रॉस फॉर्म आले होते. त्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मी आणि महायुतीचे प्रमुख नेते होते. आमच्यातले सगळे इश्यू आम्ही संपवले आहेत. तुम्हाला त्याचे प्रत्यंतर दिसेल. जे क्रॉस फॉर्म भरले गेले आहेत ते परत घेतले गेलेले दिसतील. काही ठिकाणी बंडखोरी आहे. त्यासंदर्भातली नीतीही तयार आहे. तिन्ही पक्ष मिळून यावरून मार्ग काढत आहोत. असेही त्यांनी सांगितले. चांगले लोक भाजपत प्रवेश करीत आहेत. मी सगळ्यांचे स्वागत करतो, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. साधारण ४ ते ५ तारखेपासून जोराने प्रचार सुरू होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

### जयंत पाटीलांविरोधात काँग्रेसकडून तक्रार

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याविरोधात सांगलीमध्ये काँग्रेसकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आचारसंहिता भंग केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहेत. इस्लामपूरमध्ये शरद पवार गटाच्या कार्यालयाच्या मालकी हक्कावरून काँग्रेसकडून ही तक्रार दाखल केली आहे, असे सांगण्यात येत आहे. इस्लामपूरमध्ये शरद पवार गट आणि काँग्रेसमधील कार्यालयाचा वाद आता पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. आता याचप्रकारणी जयंत पाटील यांच्याविरोधात कारवाई कारण्यात यावी, म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली आहे.

# खानावळेतील उबाठा गटाच्या कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

### आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभेचे दमदार आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन खानावळे गावातील उबाठा गटातील कार्यकर्त्यांनी मोहोपाडा येथील पक्ष कार्यालयात आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत विकासाचे कमळ हाती घेतले.

कार्यक्रमास गुळसुंदे जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, पोयंजे पंचायत समिती अध्यक्ष प्रवीण ठाकूर, तालुकाध्यक्ष तानाजी खंडागळे, ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील चव्हाण, युवा कार्यकर्ते मंगेश लबडे, बुथ अध्यक्ष प्रवीण लबडे, राजेश लबडे, राकेश ठाकुर, समीर मुजावर, दिनेश लबडे, अक्षय लबडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रवेशकर्त्यांमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे पनवेल ग्राहक संरक्षण अध्यक्ष स्वप्नील मते, युवा सेनेचे मनोज लबडे, निलेश थोरवे, सुरज कातकरी, सुनील सवार, जयेंद्र कातकरी, हेमंत कातकरी, विशाल नाईक, भरत हिलम, लक्ष्मण कातकरी, निलेश कातकरी, नथुराम कातकरी, किरण कातकरी, मनोज कातकरी, दिपेश कातकरी, रवि कातकरी यांचा समावेश आहे.

## उलवेत गॅस सिलिंडरचा स्फोट; महिलेसह दोन मुलांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

उलवे येथील जावळे गावात गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला आहे. स्फोटाची तीव्रता अतिशय भयानक होती, त्यामुळे दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर एकाने रुग्णालयात प्राण सोडले.

मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये आईसह दोन मुलांचा समावेश आहे. त्यात एक १४ वर्षांची मुलगी असून एक १३ वर्षांचा मुलगा आहे. दरम्यान, आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे, तर महिलेचे पती हे एमजीएम रुग्णालयात उपचार घेत आहेत.

दिवाळीच्या पूर्वसंध्येला पनवेल तालुक्यातील उलवे येथील जावळे गावातील घरात पाच किलोच्या दोन सिलिंडरचा स्फोट झाल्याने ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी पोहचली होती. त्यानंतर आग आटोक्यात आणण्यात आली, मात्र या भीषण स्फोटात घरातील मंजू घांची (भाटी) (४०), तिची मुलगी लक्ष्मी (१४), मुलगा चेतन (१३) तीन जणांचा मृत्यू झाला, तर त्यांचे वडील रमेश (४२) हे रुग्णालयात उपचार घेत आहेत. या घटनेने परिसरावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## रायगडात ११८ उमेदवारी अर्ज ठरले वैध



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया गुरुवारी (दि.३१) पार पडली. या छाननीमध्ये २२ उमेदवारी अर्ज अवैध ठरले. त्यामुळे आता ९४ उमेदवारांचे ११८ उमेदवारी अर्ज निवडणुकीसाठी पात्र ठरले आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ नोव्हेंबरपर्यंत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या मुदतीअखेर १११ उमेदवारांनी आपले १४० अर्ज दाखल केले होते. या सर्व नामनिर्देशन पत्रांची बुधवारी छानन‍ी करण्यात आली. उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर सर्व अर्जांची सातही विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी छाननी केली ज्यात २२ जणांचे अर्ज अवैध ठरले. त्यामुळे निवडणुकीसाठी आता ९४ उमेदवार निवडणुकीसाठी पात्र ठरले आहेत.

पनवेल मतदारसंघासाठी २३ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी नऊ अर्ज अवैध ठरले. त्यामुळे १५ उमेवारांचे अर्ज वैध ठरले. कर्जतमध्ये १३ उमेदवारांचे १५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी दोन अर्ज अवैध ठरले आहेत. उरणमध्ये प्राप्त झालेले सर्वच्या सर्व १६ उमेदवारी अर्ज वैध ठरले. पेणमध्ये १५ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते, यापैकी तीन अवैध ठरले, त्यामुळे १२ उमेदवार आहेत. अलिबागमध्ये २३ उमेदावारी अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी एक अर्ज अवैध ठरला. त्यामुळे २२ उमेदावर निवडणुकीसाठी पात्र ठरले आहेत. श्रीवर्धनमध्ये १३ उमेदवारांचे २० अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी चार अवैध ठरले त्यामुळे १६ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक आहेत. महाडमध्ये आठ उमेदावांपैकी तिघांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरल्याने पाच उमेदवार निवडणुकीत शिल्लक आहेत, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. या वेळी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे उपस्थित होते.

## निवडक

### पुण्यात तब्बल १४ कोटींचा मुद्देमाल जप्त

**पुणे** : जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेची कठोरपणे अंमलबजावणी सुरू असून, जिल्हा प्रशासनाने नियुक्त केलेल्या स्थिर व भरारी पथकांनी तसेच उत्पादन शुल्क व पोलिसांनी आतापर्यंत १४ कोटी ५७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात नऊ कोटींची रोख रक्कम, एक कोटी ८२ लाखांच्या मद्याचा समावेश आहे. याव्यतिरिक्त आचारसंहिता भंगाच्या ४८९ तक्रारीही नोंदविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली.

### निवडणूक प्रशिक्षणाला अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटीस

**गडचिरोली** : येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत २६ व २७ ऑक्टोबर रोजी मतदान अधिकाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षणासाठी गडचिरोली, धानोरा आणि चामोर्शी तालुक्यातील एक हजार ८१९ कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली, परंतु वेगवेगळी कारणे दाखवून १०८ कर्मचारी अनाधिकृतपणे गैरहजर राहिले. या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, त्यांच्याकडून तत्काळ खुलासा मागविण्यात आला आहे.

# विकासाची कामे करण्यासाठी महायुतीला ताकद द्या



### ■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रचारादरम्यान आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये ज्या पद्धतीने विकासकामे झाली, त्याच वेगाने येणाऱ्या काळातदेखील तुम्हाला अपेक्षित कामे करण्यासाठी आपण महायुती सरकाराला ताकद द्यावी आणि कमळासमोरील बटन दाबून विजयी करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि.३०) केले.

पनवेल विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे प्रत्येक मतदारापर्यंत पोहचून आमदार प्रशांत ठाकूर यांचा प्रचार करीत आहे. त्या अनुषंगाने पनवेल ग्रामीण भागातील कोळवाडी, पालेबुद्रुक, फणसवाडी, वलप, हेदुटणे, कानपोली, खैरणे, नितळस, वांवजे तसेच खांदाकॉलनी आणि कामोठे परिसरात जोरदार प्रचार करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, नागरिकांच्या समस्या तसेच त्यांच्या गरजा समोर ठेऊनच विकासकामे केली. येणाऱ्या काळातदेखील त्याच वेगाने कामे करणार अशी ग्वाही दिली.

या प्रचारावेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, एकनाथ देशेकर, दशरथ म्हात्रे, कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेविका अरुणा भगत, माजी नगरसेवक गोपीनाथ भगत, युवा नेते हॅप्पी सिंग, समाजसेविका हरजिंदर कौर, प्रदीप भगत, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, रायगड जिल्हा उपाध्यक्ष अजय मोरे, युवा वॉरिअर्स कामोठे संयोजक सुयोग वाफारे, सरपंच शैलेश माळी, राजेंद्र गोंधळी, प्रदीप माळी, दीपक उलवेकर, अशोक उलवेकर, निलेश दाढावकर, सागर सांगडे, सज्ञन पवार, ज्योत्स्ना पाटील, नवनाथ खुटारकर, रेश्मा गावंड, राजेश पाटील, अंकुश पाटील, परेश पाटील, बाळाराम पाटील, जगन्नाथ पाटील, भरत पाटील, लक्ष्मण पाटील, किरण पाटील, नरेश पाटील, चंद्रकांत पाटील, बाळाराम पाटील, आत्माराम पाटील, संदेश पाटील, स्वामी पाटील, हरिश्चंद्र खाडेकर, नारायण खाडेकर, सोपान खाडेकर, केशव टेंभे, आत्माराम टेंभे, रामदास टेंभे, गोटीराम पाटील, चंद्रकांत वनगे, सदानंद वनगे, विश्वनाथ म्हात्रे, प्रमोद उसाटकर, योगेश पाटील, चेतन पाटील, जयराज पाटील, समीर पाटील, ओंकार रॉय, स्वप्नील पाटील, प्रताप पाटील, वैभव पाटील, विवेक पाटील, आशिष पाटील, निलेश खुटारकर, प्रतिक पाटील, निखिल पाटील, जयदीप टेंभे, वैभव उसाटकर, संगम भोईर, साहिल पाटील, पांडुरंग वाघे, सुरेश वाघे, रमेश वाघे, अनंता वाघे, सुधीर वाघे, यशवंत वाघे, रमेश स. वाघे, बाळकृष्ण पाटील, राजेश पाटील, आत्माराम खानावकर, उमेश पाटील, संतोष पाटील, सचिन जोशी, निवृत्ती पाटील, अभिमन्यू पाटील, प्रल्हाद साळुंखे, भामा उघाडा, शनिवार चौधरी, बुधाजी शेठ, नारायण माळी, काशीनाथ गोंधळी, वामन माळी, कृष्णा गोंधळी, अरविंद गोंधळी, अनिल गोंधळी, ज्ञानदेव गोंधळी, गुरुनाथ गोंधळी, रमेश माळी, प्रदीप माळी, नरेश माळी, चाहू माळी, कृष्णा गोंधळी, धोंडीराम पाटील, शनिवार पाटील, जगदीश गोंधळी, भास्कर माळी, तसेच सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# कळंबोलीवासीयांची पहाट झाली सुरेल



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

श्री. बबन मुकादम युथ क्लबतर्फे आयोजित केलेल्या दिवाळी पहाट या सुरेल गायनाच्या मैफिलीने गुरुवारी (दि.३१) कळंबोलीवासीयांची पहाट झाली. या कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी भेट देत गायनांचा आस्वाद घेत सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

दिवाळी सणानिमित्त श्री. बबन मुकादम युथ क्लबच्या, प्रिया मुकादम तसेच भाजप युवामोर्चाचे प्रभाग ८ अध्यक्ष सुमीत मुकादम यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन कळंबोली सेक्टर ६मधील शिर्के गार्डनमध्ये गुरुवारी केले होते. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण हे इंडियन आयडॉल विजेते सागर म्हात्रे यांचे गायन ठरले, तसेच वंडरगर्ल मिथिला माळी, शास्त्रीय गायिका जयश्री पुजारी, लोकगीत गायक समिर पाटील यांनीही आपली कला सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना ढोलकीवर अमृत पालेकर, ऑक्टोपॅडवर हर्षद कलवाटे, सिंथेसायझरवर विशाल माळी, तबला अभिषेक नांदगावकर यांची साथ लाभली.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक बबम मुकादम, हरेश केणी, अमर पाटील, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, बबन बारगजे, तुकाराम घरत, ज्योती पाटील, प्रकाश मुंबईकर, दत्तात्रय फरांडे, प्रभाग ८ अध्यक्ष प्रकाश शेलार, युवा मोर्चा प्रभाग क्रमांक ८ अध्यक्ष सुमीत मुकादम यांच्यासह पदाधिकारी आणि रहिवाशी उपस्थित होते.

## वन नेशन, वन इलेक्शनला लवकरच मंजुरी : पीएम मोदी



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि.३१) केवडिया येथील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १४९व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. या वेळी पीएम मोदी यांनी बोलताना पुनरुच्चार केला की, आम्ही वन नेशन, वन इलेक्शनवर काम करीत आहोत. याला लवकरच मंजुरी दिली जाईल आणि ते प्रत्यक्षात आणले जाईल.

या निर्णयामुळे भारताची लोकशाही मजबूत होईल, तसेच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी देशाला नवी गती मिळेल. या वर्षाच्या सुरुवातीला मंत्रिमंडळाने या प्रस्तावाला मंजुरी दिली होती आणि या वर्षाच्या अखेरीस संसदेच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रस्ताव मांडला जाईल, तसेच भारत आता समान नागरी कायद्याच्या या दिशेने वाटचाल करीत आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

## रायगडच्या ग्रामीण भागात थंडीची चाहूल

### सकाळी धुक्यामुळे वाहनांना लागतोय ब्रेक

**कर्जत : प्रतिनिधी**

या वर्षी परतीच्या पावसाचा मुक्काम वाढल्याने ऑक्टोबर महिन्याच्या मध्यापर्यंत कधी गारवा तर कधी ऑक्टोबर हीट जाणवत होती. आता मात्र रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात पहाटेच्या वेळी धुक्याची चादर सर्वत्र पसरत असून थंडीची चाहूल लागत आहे.

या धुक्यामुळे सुसाट जाणाऱ्या वाहनांना आपसूक ब्रेक लागत आहे, मात्र लवकरच थंडी पडण्यास सुरुवात होईल, याची चाहूल पडत असलेल्या धुक्यावरून लागत आहे.

यंदा परतीचा पाऊस अगदी ऑक्टोबर महिन्याच्या मध्यापर्यंत लांबला. त्यामुळे हवी तशी हीट जाणवली नाही. मागील एक- दोन दिवस थोडा उकाडा वाढला होता, मात्र ऑक्टोबर महिना सरत असताना धुके पडायला सुरुवात झाली.



धुक्यात वाहनांच्या भीतीने मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्या रोडावली. हे धुके इतके पडत आहे की, समोरून येणाऱ्या माणूस दिसत नाही. त्यामुळे अपघात होऊ शकतो, मात्र धुक्यामुळे सुसाट वाहनचालकांना ब्रेक बसला आहे.

दाट धुक्यामुळे वाहनचालकांना हेडलाईट लावून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे इच्छित स्थळी वेळेवर पोहचण्यासाठी अर्धा-पाऊण तास लवकर निघावे लागत आहे.

## निवडक

### वाहनाच्या धडकेने पादचारी ठार

**खोपोली :** पायी जात असलेल्या अनिल हवलदार राजभर (वय ४९, मूळ रा. उत्तर प्रदेश) त्याला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना खोपोली पाली मार्गावर घडली आहे. अनिल हा मंगळवारी संध्याकाळी सुमारास पाली खोपोली राज्य मार्गावर उंबरे गावाजवळील मुसळेज हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जात असताना अज्ञात वाहनाची त्यांना धडक बसली. अनिल यांना लहान मोठया स्वरुपाच्या गंभीर दुखापती होऊन त्यांचा मृत्यू झाला. वाहनचालक अपघाताची खबर न देता पळुन गेलेल्या त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार राहुल गायकवाड हे करीत आहे

### सोमाटणेतून एक जण बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील सोमाटणे येथे राहणारे ५५ वर्षीय



व्यक्ती मित्राकडे जातो असे सांगून घरातून निघाले तो अद्याप आले नाही. त्यामुळे ते बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. बाळाराम सिताराम पाटील असे बेपत्ता व्यक्तीचे नाव असून त्यांचा रंग गोरा, उंची सहा फूट, डोळे काळे, केस काळे पांढरे, डाव्या हातात रॉड टाकलेला असल्याने ऑपरेशनचे व्रण आहत. त्यांना आगरी भाषा बोलता येते. त्यांच्यासोबत मोबाईल (८६५२२४१२४३) आहे. या व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### दिवाळीनिमित्त झाड लावण्याचे आवाहन

**नवी मुंबई :** महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिवाळीनिमित्त नागरिकांना दिल्या शुभेच्छा व 'स्वच्छ, पर्यावरणपूरक, प्लास्टिकमुक्त दिवाळी' साजरी करण्याचे आवाहन केले. तसेच फटाके उडवताना काळजी घेण्याचे तसेच स्वच्छता राखण्याचे आवाहन देखील आयुक्तांनी नागरीकांना केले. आवाजाचे फटाके वाजवक्याने रुग्ण, वृद्ध लहान मुलांना त्रास होतो याची काळजी घेण्याचे आवाहन आयुक्तांनी केले. यासोबत दिवाळीनिमित्त प्रत्येकाने एक झाड लावावे असे आवाहन करत पर्यावरण वाढवण्याचे आवाहन आयुक्तांनी केले.

### ऐरोलीमध्ये वाहनाच्या धडकेत मृत्यू

**नवी मुंबई :** भरधाव वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना ऐरोलीत घडली. याप्रकरणी अज्ञात वाहन चालकावर रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ऐरोली सेक्टर ५ येथे मंगळवारी रात्री हा अपघात घडला. परिसरात राहणारे बालाजी फुले हे रस्त्यालगत चालत असताना अज्ञात वाहनाने त्यांना धडक देऊन वाहनचालकाने त्यांच्या मदतीला न थांबता पळ काढला. अपघातानंतर नागरिकांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानुसार रबाळे पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# निवडणूककाळात पोलिसांची करडी नजर

## रायगड जिल्ह्यात आत्तापर्यंत १२ कोटी ७७ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील पोलिसांनी सर्वच विभागात करडी नजर ठेवली आहे. आत्तापर्यंत १२ कोटी ७७ लाख रुपयांची मालमत्ता पोलीस यंत्रणांनी जप्त करण्यात आली आहे.

यात मद्य, अंमली पदार्थ, सोने चांदी आणि बनावट सिगारेट यांचा समावेश आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली. ते अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे उपस्थित होते.



विधानसभा निवडणुक आचार संहीता लागू झाल्यापासून जिल्ह्यात नाका बंदी करून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली जात आहे.

यासाठी सर्वेक्षण पथकांची नेमणुक करण्यात आली आहे. ठिकठिकाणी तपासणी नाके तैनात करण्यात आले असून, गेल्या १५ दिवसांत तब्बल १२ कोटी ७७ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

यात ९० लाख ९५ हजार रुपयांची दारू, उरण येथून १ कोटी ३१ लाख रुपयांचे अंमली पदार्थ, खालापूर टोल नाका येथून पाच कोटी रुपयांची सोनं-चांदी आणि कर्जत येथून पाच कोटींची बनावट सिगरेट आणि ते बनवण्यासाठी लागणारे साहित्य आदींचा समावेश आहे अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीसांनी प्रतिबंधात्मक कारवाईला व्यापक प्रमाणात सुरुवात केली आहे. चार जणांना तडीपार करण्यात आले असून आणखिन १५ ते २० जणांचे प्रस्ताव प्रांताधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले आहेत. जिल्ह्यात १ हजार ६४९ शस्त्र परवानाधारक आहेत. त्यापैकी १ हजार ४२३ शस्त्र जमा करण्यात करण्यात आली आहेत. २०५ जणांना शस्त्र बाळगण्याची परवानगी देण्यात आली असल्याची माहिती या वेळी पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

# दिवाळी व छठपूजा सणामध्ये मध्य रेल्वेच्या विशेष व्यवस्था

**रोहे : प्रतिनिधी**

सणासुदीच्या काळात वाढलेल्या प्रवाशांच्या मागणीचे व्यवस्थापन करण्यासाठी मध्य रेल्वे ५८३ आरक्षित व अनारक्षित विशेष ट्रेन सेवा चालवत आहे.

छठ आणि दिवाळीनिमित्त भारतीय रेल्वेकडून ७,२९६ विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. तर गेल्या वर्षी ४,५०० विशेष गाड्या चालवण्यात आल्या होत्या. २९ व ३० ऑक्टोबर रोजी भारतीय रेल्वेने अनुक्रमे १३६ आणि १६४ विशेष गाड्या चालवल्या. या अतिरिक्त सेवांमुळे दिवाळी व छठ पूजा करण्यासाठी त्यांच्या गावी परतणाऱ्या अतिरिक्त प्रवाशांची पूर्तता करण्यात मदत होईल. या ट्रेन्समध्ये विशेष, वातानुकूलित, शयनयान, जनरल कोच आणि अनारक्षित विशेषच्या मिश्र संयोजन असलेल्या ट्रेन्सचा समावेश आहे.

दिवाळी व छट पूजा उत्सवासाठी मुंबई, पुणे, नागपूर इ. येथून देशभरातील दानापूर, गोरखपूर, छपरा, बनारस, समस्तीपूर, आसनसोल, आगरतळा, संत्रागाछी आणि मार्गातील ठिकाणांसाठी विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. महाराष्ट्रातील लातूर, सावंतवाडी रोड, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड अशा विविध ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांसाठी फेस्टिव्हल स्पेशल ट्रेनही चालवल्या जात आहेत. दक्षिणेकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी करीमनगर, कोचुवेली, काझीपेट, बेंगळुरू आणि इतर ठिकाणांसारख्या विविध ठिकाणी विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

प्रवाशांची सोय आणि सुविधा सुनिश्चित करण्यासाठी मध्य रेल्वेने प्रवासी सुविधा वाढवल्या आहेत. आपल्या नेटवर्कवर अनेक उपाय लागू केले आहेत. महत्त्वाच्या स्थानकांवर प्रवाशांना मार्गदर्शन आणि मदत करण्यासाठी 'मे आय हेल्प यू' बूथ प्रदान केले आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी विविध स्थानकांवर तिकीट काउंटरची संख्या वाढवली आहे. प्रमुख स्थानकांवर प्रवासी होल्डिंग क्षेत्रे तयार केली आहेत.

आगामी सणासुदीच्या काळात प्रचंड गर्दीच्या अपेक्षेने मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण, पुणे आणि नागपूर स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर ८.११.२०२४ पर्यंत तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. प्लॅटफॉर्मवरील गर्दीचे व्यवस्थापन करणे व स्टेशन परिसरात प्रवाशांची सुरळीत हालचाल सुनिश्चित करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. ज्येष्ठ नागरिक व वैद्यकीय गरजा असलेल्यांना प्रवास सुलभ व्हावा यासाठी या निर्बंधांमधून सूट देण्यात आली आहे.

गर्दी रोखण्याच्या प्रयत्न म्हणून ठाणे आणि कल्याण येथून सामानाची आवक/जावक वाहतूक १०.११.२०२४ पर्यंत प्रतिबंधित केली आहे. विशेष रेल्वे सेवांबद्दल अधिक माहितीसाठी प्रवासी कृपया http://www.enquiry.indianrail.gov.in ला भेट देऊ शकतात किंवा NTES ॲप डाउनलोड करू शकतात. असे मध्य रेल्वेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# जेजे स्कूल ऑफ आर्ट ही संशोधन करणारी संस्था बनावी

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

१९ व्या दशकापासून कलेचा वारसा जपणारे जे.जे. स्कूल ऑफ आर्टने आपली ही परंपरा भविष्यात अशीच कायम ठेवावी. विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतर जेजे स्कूलने प्रमाणपत्र देणारी संस्था न बनता सेंटर ऑफ ग्लोबल एक्सलेन्स आणि संशोधन करणारी संस्था बनावी, असे केंद्रीय शिक्षण आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री धर्मेंद्र प्रधान जेजे स्कूल ऑफ आर्टला 'डी नोव्हो' दर्जा देताना म्हणाले.

कलेच्या शिक्षणात अव्वल असलेल्या मुंबईतील जे.जे. स्कूल ऑफ आर्टला गुरुवारी धर्मेंद्र प्रधान यांनी 'डी नोव्हो' विद्यापीठाचा दर्जा बहाल केला. त्यामुळे सर ज.जी. कला, वास्तूकला व उपयोजित कला महाविद्यालयाऐवजी आता सर ज.जी. कला, वास्तूकला व अभिकल्प विद्यापीठ या नावाने ओळखले जाणार आहे.

जेजे स्कूल ऑफ आर्टला विद्यापीठाचा दर्जा आता मिळाला आहे. त्यामुळे अनेक नव्या सुविधा विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना




मिळतील. नव्या सुविधा मिळणार असल्या तरी जे.जे. स्कूल ऑफ आर्टचे मूळ चरित्र बदलता कामा नये. देशातील कला क्षेत्रात जे.जे. स्कूल ऑफ आर्टचे योगदान उल्लेखनीय आहे. जे.जे. स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थ्यांनी देशविदेशात नावलौकिक मिळवलेला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार या विद्यापीठाने आपला अभ्यासक्रम निश्चित करून अन्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांना कलेचा अभ्यास करता येईल यावर लक्ष केंद्रित करावे, असे धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले. देशातील तरुणांमधील कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे असेही प्रधान म्हणाले.

# कर्जत पोलिसांकडून कडाव व कर्जत शहरात रूटमार्च

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा निवडणुकीसाठी कर्जत पोलिसांकडून कर्जत शहरात तसेच कडाव येथे शक्ती प्रदर्शन करण्यात आले. पोलिसांच्या या रूटमार्चमध्ये पोलीस दलाची ताकद दिसून आली.



विधानसभा निवडणुकीचे निमित्ताने मतदान शांततेत पार पडले जावे यासाठी पोलिसांची तयारी सर्व सामान्य जनतेला दिसून यावी यासाठी पोलिसांनी रूटमार्च काढून जनतेला आश्वस्त करण्याचे काम केले. कर्जत पोलीस ठाणे कडून पोलीस उप अधीक्षक टी टी टेळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्यासह अन्य चार पोलीस अधिकारी तसेच पोलीस कर्मचारी आणि सीआरपीएफ चे जवान यांची सशस्त्र तुकडी य रूटमार्चमध्ये सहभागी झाली होती. कर्जत पोलीस ठाणे यांच्या वतीने काढण्यात आलेले रूटमार्च कशेळे गाव आणि बाजारपेठ येथे काढण्यात आले. त्यानंतर कडाव गावातदेखील हे रूटमार्च काढण्यात आले.

कडाव गावातील मुरबाड कर्जत राष्ट्रीय महामार्ग वरील मुख्य बाजारपेठ तसेच कडाव गाव आणि कडाव बौद्ध वाडा वेलकम हॉटेल कडाव येथे समाप्त करण्यात आला. त्यानंतर कर्जत शहरात रूटमार्च काढण्यात आला.

कर्जत पोलीस ठाणे येथून निघालेले हे शक्ती प्रदर्शन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून महावीर पेठ मार्गे कर्जत जकात नाका मुख्य बाजारपेठ येथून लोकमान्य टिळक चौक असा हा रूटमार्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि शेवटी कर्जत पोलीस ठाणे येथे समाप्त झाला.

# अलिबागेतील गोंधळपाडा रस्त्यावर सापडले पैसे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यात विधानसभा निवडणुकांचा धुराळा उडाला असताना अलिबागमधील रस्त्यावर पैशांचा पाऊस पडल्याची घटना घडलीय. येथील स्थानिक नागरिकांना रस्त्यावर पाच-पाचशे रुपयांचे नोटा सापडल्या. ही घटना घडलीय अलिबाग तालुक्यातील गोंधळपाड रस्त्यावर. निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना रस्त्यावर असे पैसे सापडत असल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, रस्त्यावर पैशांचा बंडल आणि खुल्या नोटा पडल्या होत्या. त्या कोणच्या होता त्याची माहिती कुणालाच मिळाली नाही. मात्र रस्त्यावर पडलेल्या नोटांच्या बंडल पाहून अनेकांनी हात साफ केला. बहुतेकजण नोटा घेऊन पसार झालेत. तर काही जागृक नागरीकांनी पोलिसांना खबर देते मिळालेले पैसे केले पोलिसांच्या स्वाधीन



केलेत. दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रस्त्यात पैसे सापडण्याच्या घटनेला विशेष महत्त्व आलेय.

रस्त्यांवर पैसे पडलेले पाहून नागरिक पाचशे-पाचशे नोटा उचलून घरी घेऊन जात होते. एका प्रत्यक्षदर्शी म्हणाला, गोंधळपाडा रस्त्यावरून जात असतांना काही लोकांचा घोळका मला दिसला. त्यामुळे मी थांबलो, मला वाटलं अपघात झाला असावा, परंतु जवळ गेल्यानंतर वेगळचं सत्य समोर आलं. ते लोक रस्त्यावर पडलेल्या नोटा उचलत होते. अनेकांना ५००-५०० च्या नोटा जमा केल्या होत्या. काय झालं कोणाचे पैसे आहेत, असं प्रश्न करेपर्यंत सर्व लोक पैसे घेऊन पसार झालेत. त्यानंतर आमच्या हाती ५००ची लागली. त्यानंतर एका मुलीला २००० रुपये मिळाले. आम्ही त्यानंतर पोलिसांना कॉल केला आणि पुढील तपास पोलीस करत असल्याचं माहिती एका नागरिकाने दिली.

एका मुलीलाही रस्त्यावर पैसे सापडले. ती म्हणाली की, गोंधळपाडा रस्त्यावरून एसपी ऑफिसला जात होतो. त्यावेळी मला रस्त्यावर अडीच हजार रुपये सापडले. पैशांच्या बंडल पडले होते. तर काही खुल्या नोटा होत्या. त्यातून मला अडीच हजार रुपये सापडले, ते आपण पोलिसांना दिल्याची माहिती या मुलीने दिलीय.

# मध्य रेल्वेतर्फे दक्षता जागरुकता सप्ताह



**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत विविध कार्यक्रमांद्वारे राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती या थीम अंतर्गत दक्षता जागरूकता सप्ताह पाळत आहे.

या वेळी बुधवारी (दि.३०) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील सभागृहात एक चर्चासत्र आणि समारोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. एनम सिक्युरिटीज प्रा. लि.चे संस्थापक सदस्य वल्लभ भन्साळी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या चर्चासत्राचे अध्यक्षस्थानी मध्य रेल्वे महाव्यवस्थापक धरम वीर मीना, अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रभात रंजन, विविध विभागांचे प्रधानाध्यक्ष, एचओडी, विभागीय रेल्वे व्यवसृथापक- मुंबई, आणि इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान या वर्षीच्या दक्षता थीमवर प्रकाश टाकणारा मस्त कलंदर हा लघुपट दाखवण्यात आला. मध्य रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी एकत्रितपणे तयार केलेल्या या चित्रपटाची संकल्पना आणि दिग्दर्शन प्रतीक गोस्वामी, वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक आणि मध्य रेल्वेचे मुख्य दक्षता अधिकारी यांनी केली आहे.

या कार्यक्रमादरम्यान थेट सादर केलेल्या उत्कृष्ट स्किटसह वादविवाद, निबंध, रेखाचित्रे, घोषवाक्य, स्किट्स आणि लघुपट यासह विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. मध्य रेल्वेच्या दक्षता विभागाने प्रसिद्ध केलेल्या 'सुबोध' या विशेष वृत्त बुलेटिनचेही अनावरण करण्यात आले.

वल्लभ भन्साळी यांनी राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती या विषयावर भाषण केले. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरम वीर मीना यांनी भारतीय रेल्वेमध्ये विश्वास, सहयोग आणि नाविन्य वाढवण्यामध्ये सचोटीचे महत्त्व अधोरेखित केले.

# मुरूडमध्ये दिवाळी पहाट कार्यक्रम उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हयातील जंजिरा संस्थान कालीन मुरूडच्या सार्वजनिक वाचनालयात दरवर्षाप्रमाणे गुरुवारी (दि.३१) स्थानिक कलावंताच्या कलाविष्कारातून संगीत दीपोत्सव या विविधरंगी कार्यक्रमाने दिवाळी पहाट कार्यक्रमाचा शुभारंभ दीप प्रज्वलनाने नैनिता कर्णिक यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उपाध्यक्षा दीपाली जोशी, सदस्य प्रवीण बैकर, कोमसाप शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, ग्रंथपाल उत्कर्षा गुंजाळ, सानिका भायदे, स्वप्निल भायदे व वाचक वर्ग उपस्थित होते.

दीवाळी पहाट कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध गायक सुरेश सदरे यांच्या ओंकार स्वरूपा या गीताने झाली. त्यानंतर राहुल वर्तक, पूजा सद्रे, मनीष माळी, अमोल रणदिवे, राज पुलेकर , सिद्धेश करंबे, राघव करंबे आदी नवोदित गायकांनी अतिशय सुंदर गीते सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली.

कार्यक्रमाचे खुमासदार सुत्रसंचलन प्रेरणा चौलकर यांनी केली तर हार्मोनियम साथ मंदार मुंबईकर,तबला व ढोलकी ची साथ महेश सुर्वे यांनी दिली. दोन तास रंगतदार संगीत पहाट कार्यक्रम सादर केल्याबद्दल वाचनालयातर्फे दीपाली जोशी यांनी आभार मानले.



# माथेरानमध्ये पर्यटकाला सर्पदंश

**माथेरान : प्रतिनिधी**

कल्याण येथील शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख तथा माजी नगरसेवक महेश पाटील हे फिरण्यासाठी माथेरानमध्ये आले होते. त्यांना माथेरान मध्ये सर्पदंश झाल्याची घटना घडली. हा प्रकार निदर्शनास येताच त्यांना येथील रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.

विषारी सर्पदंश असल्याने त्यांना डोंबिवली येथील खासगी रुग्णालयात दाखल केले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. माथेरान पर्यटनस्थळ संपूर्ण जंगलाने व्यापलेले आहे. या जंगलात अनेक प्रकारचे सरपटणारे प्राणी आढळून येतात.आता नुकताच पावसाळी हंगाम संपला असून या पावसाळी हंगामात विविध जातीचे सर्प याठिकाणी निदर्शनास येतात.



कल्याण येथील महेश पाटील हे आपल्या कुटुंबासह माथेरान पर्यटनस्थळी आले होते. माथेरानमधून परत घरी जाण्याची तयारी करीत असताना रात्रीच्या वेळी आपल्या मित्राच्या घराबाहेर बुटाची लेस बांधत असते वेळी चापड्या (बांबू पिट वायपर) जातीच्या सापाने त्यांच्या उजव्या हाताला चावा घेतला त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ तेथील नजीकच्या बी.जे रुग्णालयात दाखल करण्यात आले.

याठिकाणी त्यावर प्रथमोपचार करून त्यांनालगेच डोंबिवलीतील खासगी रुग्णालयात दाखल केले. आता त्यांची प्रकृती सुधारत असल्याची माहिती त्यांचे निकटवर्तीय संजय राणे यांनी दिली.

# ड्रग्स पार्टीचा बेत पोलिसांनी उधळला

## नायजेरीयन नागरिकांची धरपकड; २७ लाखांचे मेफेड्रॉन तसेच दारू जप्त

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने सोमवार २८ ऑक्टोबर रोजी पहाटे खारघरमध्ये २ रो-हाऊसवर छापे मारुन ड्रग्स तसेच दारूपार्टीसाठी जमलेल्या २० नायजेरीयन नागरिकांची धरपकड केली आहे. यात १३ पुरुष आणि सात महिलांचा समावेश आहे.



खारघर सेक्टर-७ मधील लेमन किचन व जेमिनी किचन या २ नाजयेरीयन किचनमध्ये ड्रग्स तसेच दारुच्या पार्ट्या सुरू असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेतील १५० जणांचे पोलीस पथक, दंगल नियंत्रण पथक व फॉरेन्सिक टिमने छापा टाकला. या वेळी २० नायजेरीयन पुरुष व महिला हे पार्टी करीत असताना आढळून आले. या सर्वांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यावेळी अमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या झडतीत तब्बल २६ लाख ७७ हजार ५०० रुपये किंमतीचे १०७ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन व २२,४९० रुपये किंमतीचा मद्यसाठा आढळुन आला असून पोलिसांनी अमली पदार्थ व मद्याचा साठा जप्त केला आहे.

या कारवाईत पकडण्यात आलेल्यापैकी १३ नायजेरीयन नागरीकांनी कोणताही भाडे करार न करता तसेच सी फॉर्म न भरता खारघरमध्ये लेमन किचन व जेमिनी किचन चालवत असल्याचे तपासात आढळुन आले आहे. त्यामुळे पोलिसांनी या १३ नायजेरीयन नागरीकांविरोधात परदेशी नागरिक कायदा व रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. तसेच दोन्ही किचनच्या जागामालकानादेखील या गुन्ह्यांमध्ये सहआरोपी केले आहे. न्यायालयाने या सर्व आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.

# विरोधकांकडे कोणताही मुद्दा नसल्याने ते जाती-धर्माचे मुद्दे उचलताहेत -धुमाळ

**उरण : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा चिटणीस रूपेश धुमाळ यांनी समाजकार्या सोबतच आता राजकारणाची कास धरली आहे. उरणचे आमदार महेश बालदी यांनी नुकताच निवडणूक अर्ज दाखल केला. या वेळी भव्यदिव्य शक्तिप्रदर्शन करत सभा घेण्यात आली. त्यानंतर पत्रकार परिषद घेत रूपेश धुमाळ यांनी आपली परखड भूमिका स्पष्ट केली आहे.



उरणचे आमदार महेश बालदी हे परप्रांतीय असल्याचे हिणवणाऱ्यांवर रूपेश धुमाळ यांनी चांगलाच पलटवार केलाय. उरणमध्ये विशिष्ट जातीच्या नेत्यानेच नेतृत्व करावे हे बंधनकारक नाही. विरोधकांकडे कोणताही मुद्दा नाही, त्यामुळे ते जाती-धर्माचे मुद्दे उचलत आहेत अशी टीका त्यांनी केली आहे.

२०१४च्या निवडणुकीत आगरी-कोळी-कराडी संघाने विवेक पाटीलांना पाठिंबा दिला. त्यांनी आमच्या समाजातील लोकांची माती केली, मात्र आमदार महेश बालदी यांनी आमच्या समाजाचे अस्तित्व उरणमध्ये जोपासले आणि तरुणांना रोजगार मिळवून दिला, त्यामुळेच त्यांना जाहीर पाठिंबा असल्याचे या वेळी धुमाळ यांनी सांगितले.

भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर लोकनेते दि.बा. पाटीलांच्या पावलावर पाऊल ठेवून आपण समाजासाठी कार्यरत राहणार असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. विमानतळावर हजारो नोकऱ्या उपलब्ध होत आहेत. स्थानिकांना नोकऱ्या देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. येथे १०० टक्के प्राधान्य स्थानिक भूमिपुत्रांना मिळणार असून यासाठी आमदार महेश बालदी यांनी मोलाचे काम केल्याचे त्यांनी सांगितले.

विमानतळावर आता झालेल्या नुकत्याच नोकर भरतीत स्थानिक भूमिपुत्रांना नोकर्या मिळाल्या आहेत. परिसरातील युवकांनाही नोकर्या मिळाव्यात, यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. भाजपचे कार्यकर्ते उरणच्या तळागाळात पोहचलेत. आमदार बालदी यांनी केलेली विकासकामे आगरी-कोळी-कराडी समाजाच्या लोकांसाठीच केली आहेत असेही धुमाळ त्यांनी स्पष्ट केले.

राजकारणात एकनिष्ठता हवी त्यामुळेच अटल बिहारी वाजपेयी यांच्या आदर्शावर आपण कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. पुढील काही दिवसात नवी मुंबईचे विमानतळ दि. बा. पाटीलांच्या नावानेच ओळखले जाईल, असा विश्वास रूपेश धुमाळ यांनी यावेळीवर्तवला. आमदार महेश बालदी यांनी हजारो करोडोंची विकास कामे उरणमध्ये केली आहेत. त्यामुळे विकास करायचा असेल तर प्रचंड बहुमताने आमदार बालदी यांनाच निवडून द्या, असे आवाहन धुमाळ यांनी उरणच्या जनतेला केले आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**पनवेल : वार्ताहर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १ व २ मधील पोलीस अधिकाऱ्यांच्या तातडीने बदल्या करण्यात आल्या आहेत.



परिमंडळ २ अंतर्गत कळंबोलीचे वपोनि श्रीकांत धरणे यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. तळोजाचे वपोनि अविनाश काळदाते यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. तानाजी भगत यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. सुनील कदम यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. सीबीडीचे वपोनि गिरीधर गोरे यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. खांदेश्वरचे वपोनि चंद्रकांत लांडगे यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. न्हावा-शेवाचे वपोनि अंजुम बागवान यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. खारघरचे वपोनि वैशाली गलांडे यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. वपोनि संजय नाळे यांची सुद्धा मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. तुर्भेचे पो.नि.संजय जोशी यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. सुनील शिंदे यांची मुंबई येथे बदली करण्यात आली आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पो.नि.जगदीश शेलकर यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे.

खांदेश्वरचे पो.नि.संजय चव्हाण यांची सुद्धा मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. महेश पाटील यांची मुंबई येथे बदली करण्यात आली आहे. माणिक नलावडे यांचीसुद्धा मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. प्रकाश सपकाळ यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला येथे बदली करण्यात आली आहे. सुधाकर ढाणे यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे.

# दिवाळीनिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी भारतात मोठ्या स्तरावरती साजरा केला जातो. ईट प्ले रीडच्या अभियानाच्या दृष्टिकोनातूनदेखील हा उत्सव आनंदाने साजरा केला.



नवी मुंबई-पनवेल, नेरूळमधील शिरवणे या गावामध्ये अभियाना अंतर्गत सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचून जनजागृती करण्यात आली व दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या आणि दिवे वाटप करण्यात आले.

ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक आणि मॅनेजिंग डायरेक्टर ऑफ भावना ग्रूप अपर्णा शहा यांचा अभियाना संदर्भ हेतू त्यांच्या राजदूतांच्या माध्यमातुन पोहचवला. आपण समाजाचे एक घटक म्हणून आपली ही समाजासाठी काही जबाबदारी आहे. आपल्या परीने आपण कार्य करावे. ईट प्ले रीडच्या माध्यमातून ईट प्ले रिडची टीम एक अभियान राबवत आहे, जे समाजाच्या सवयीना चांगल्या सवयीमध्ये परिवर्तन करण्यात कार्यरत आहेत. केवळ खाणे नसून ते विचारपूर्वक खा, केवळ खेळ नसून मजेशीर खेळा केवळ वाचन नसून कुतूहलाने वाचा.

मागील एक वर्षापासून हे अभियान ही संस्था राबवत आहे असे त्यांनी नमूद केले.

# स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली जासई येथील पक्ष कार्यालयांमध्ये उरण तालुक्यातील व शहरातील कार्यकर्त्यांची बैठक झाली.



त्यावेळेला तालुकाध्यक्ष अमित वाघमारे यांनी महेश साळुंखे यांचे स्वागत केले. उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना महेश साळुंखे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये कोणत्या पक्षाला पाठिंबा द्यायचा याचा येत्या दोन दिवसात निर्णय घेतला जाईल व तो कार्यकर्त्यांना कळविण्यात येईल. या वेळी उरण तालुक्यातील पदाधिकारी अशोक वाघमारे, बळीराम गायकवाड, रोशन गायकवाड, प्रमोद खैरे इत्यादी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

# पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने माझी वसुंधरा ५.० अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल कामोठे येथे पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याविषयी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच पर्यावरण विषयावर आधारित विद्यार्थ्यांच्या रांगोळी स्पर्धा व पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनविण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या.



या वेळी रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, शिक्षक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी कशी साजरी करावी याबाबत महापालिकेच्यावतीने माहिती देण्यात आली. दिवाळीच्या दरम्यान फटाके उडवल्याने मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होते असते तसेच ध्वनी प्रदूषणाचे प्रमाणही वाढते. परिणामी श्वसनाचे त्रास होऊ लागतात. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने दिलेल्या सूचनेनूसार ग्रीन फेस्टीवल अंतर्गत फटाकेमुक्त दिवाळी, प्रदूषण मुक्त दिवाळी विद्यार्थ्यांनी साजरी करावी यादृष्टीने हा कार्यक्रम घेण्यात आला.

पर्यावरण विषयावर आधारित विद्यार्थ्यांच्या रांगोळी स्पर्धा व पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनविण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या वेळी विद्यार्थ्यांनी पुर्नवापर करण्यात येणाऱ्या वस्तूपासून पर्यावरणपूरक आकाश कंदिल बनविले.

# उरण महाविद्यालयाची आदिवासींसोबत दिवाळी

## बेलडोंगरीवासीयांच्या चेहऱ्यावर फुलले हसू

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी उरण तालुक्यातील आदिवासी कातकरी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात येते. यावर्षी सारडे ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या बेलडोंगरी या आदिवासी कातकरी वडीवर दिवाळी साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमात एकूण २५ महिलांना बारावारी व नऊवारी साडी, २७ पुरुषांना कपडे, १२ मुले व १२ मुलींना कपडे, शालेय साहित्य व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य के ए शामा यांनी या वेळी गरीब व आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या आपल्या बांधवांसोबत दिवाळी साजरा करण्याचा उद्देश सर्वांसोबत विशद केला व दिलेली भेट स्वीकारल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनेकांनी आर्थिक मदत केली त्यामध्ये के ए शामा रु.१५०००, तानाजी घ्यार रु.१००००, हितेंद्र घरत रु १००००, रोहित पाटील रु ५०००, नरेंद्र पाटील ४०००, तेजस आठवले २०००, नवीन राजपाल २०००, मंगेश म्हात्रे २०००, डॉ.ए.आर.चव्हाण, २००० प्रा. व्ही एस इंदुलकर २०००. तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आर्थिक मदत केली. उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांच्या हस्ते आदिवासी बांधवांना दिवाळी फराळ, कपडे तसेच शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

दिवाळी फराळ अतिशय आनंदाच्या भावनेने आदिवासी बांधवांना सुपूर्त केला व त्या बांधवांसोबत दिवाळी पहाट केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर, तेजस बाळकृष्ण ठाकूर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे, माजी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वीप कार्यक्रमांतर्गत बचत गटातील महिलांची बैठक व रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल मतदारसंघामध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे निर्देशानुसार व स्वीप प्रमुख शहर अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच मतदान जनजागृति कार्यक्रमांतर्गत डेएनयुएलएम विभाग मार्फत कळंबोली येथे नुकतीच बचत गटातील महिलांकरिता बैठक घेण्यात आली. यासोबतच तळोजा फेज १ येथे बचत गटातील महिलांची बैठक व रॅली काढण्यात आली.




या वेळी डेएनयुएलएमचे विनया म्हात्रे, नवनाथ पवार, अभियंता गजानन देशमुख, अभियंता प्रसाद परब व बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. येत्या २० नोव्हेंबर रोजी पनवेल विधानसभेची निवडणुक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी १८८ पनवेल अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे.

स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी स्वीप पथक प्रमुख शहरअभियंता संजय कटेकर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका हद्दीतील महाविद्यालयामध्ये तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

यामध्ये प्रामुख्याने, प्रभातफेरी, बाईक रॅली, सायकल रॅली काढणे, वक्तृत्व, घोषवाक्ये, चित्रकला स्पर्धा, बचत गटातील महिलांची बैठक व रॅली काढण्यात येत आहे.

# फुंडे येथील विद्यार्थ्यांचा जयपुर येथे सन्मान

**उरण : वार्ताहर**

राजस्थान शासनाच्या कला व संस्कृती विभागाच्या जवाहर कला केंद्र जयपुर येथे १८ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या २७व्या लोकरंग महोत्सवामध्ये आयोजित आदिवासी नृत्या मध्ये प्राविण्यपूर्ण सादरीकरणाबद्दल महाविद्यालयाच्या प्रियांका पाटील, तनुजा पाटील व जिग्नेश सणस या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी बुधवार (दि. ३०) यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व भविष्यातील विविध स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कार्यालयीन अधीक्षक बाळकृष्ण दगडे व सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. सुजाता पाटील उपस्थित होते.





**कामोठे : दिवाळीत किल्ले तयार करण्यासाठी लहान मुले फार उत्सुक असतात. शहरातील रिद्धी सिद्धी कृपा सोसायटी येथे बनविलेला किल्ला.**



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यासोबतच राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ घेण्यात आली. या वेळी आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त कैलास गावडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

## संपादकीय

# लक्ष्मीची पावले

एप्रिल ते सप्टेंबर या सहामाहीत रिझर्व्ह बँकेने तिच्या देशांतर्गत सोन्याच्या साठ्यात १०२ मेट्रिक टनांची भर घातली आहे अशी माहिती रिझर्व्ह बँकेने नुकतीच जाहीर केली. दिवाळीसारख्या समृद्धी आणि संपन्नतेच्या सणाच्या काळातच, अगदी धनत्रयोदशीच्या दिवशी रिझर्व्ह बँकेने आपले सोने मायदेशी परतल्याची ही आनंदवार्ता देशवासियांना दिली. देशातच सोन्याची साठवणूक केल्याने परदेशी बँकेत सोने ठेवण्याच्या साठवणूक खर्चात बचत होणार असून यातून भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्थिरतेवरील विश्वासाचे संकेतही जगभराला मिळणार आहेत.

**दिवाळीचा सण म्हणजे दिव्यांचा लखलखाट, खरेदीचा ओसंडून वाहणारा उत्साह, शक्य असल्यास सोन्याचांदीचीही खरेदी आणि मुहुर्तावर घरीदारी सर्वत्र केले जाणारे लक्ष्मीचे पूजन. या अशा सुमुहुर्तावर ब्रिटनमधील बँक ऑफ इंग्लंडच्या तिजोरीतील भारताच्या सोन्याच्या साठ्यातील १०२ टन सोने भारतात परत आल्याचे रिझर्व्ह बँकने जाहीर केले आहे. सोन्यावर उदंड प्रेम करणारे भारतीय या आनंदवार्तेने नक्कीच सुखावले आहेत. भारताच्या कानाकोपऱ्यात सर्व धर्म आणि संस्कृतीच्या लोकांमध्ये सोन्याला महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय सोनेखरेदी करतात आणि त्या सोन्याला आयुष्यभर जपतातही कारण भारतीय सोन्याकडे निव्वळ आर्थिक गुंतवणूक म्हणून पाहात नाहीत तर त्यांची या धातूमध्ये भावनिक गुंतवणूकही असतेच. त्यामुळे धनत्रयोदशीच्या दिवशी रिझर्व्ह बँकेकडील सोन्याचा साठा वाढल्याची बातमी मिळणे हा भारतीयांसाठी शुभशकुनच म्हणायला हवा. आणि तसा तो आहेही. जागतिक स्तरावर सोन्याकडे एक सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिले जाते. जगभरात सध्या अनेक ठिकाणी युद्धे व सशस्त्र संघर्ष सुरू आहे. अनेक प्रदेशांमध्ये राजकीयदृष्ट्या अस्थिरता आहे वा अन्य देशांबरोबरचे संबंध तणावग्रस्त असल्याने अस्वस्थता आहे. अशा स्थितीत आपल्या मालकीचे सोने आपल्या ताब्यात असलेले उत्तम हा मूलभूत विचार सोने परत आणण्याच्या केंद्रसरकारच्या निर्णयामागे आहे. गेल्या काही वर्षांपासून भारत हळूहळू सोन्याचा साठा देशांतर्गत स्थानिक तिजोरीत हलवत आहे. हे परत आणलेले सोने मुंबईतील मिंट रोड येथील रिझर्व्ह बँकेच्या आधीच्या मुख्यालयात तसेच नागपूर येथे ठेवले जाणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीत असलेल्या सोन्याचे एकूण प्रमाण ३० सप्टेंबरपर्यंत ५१०.४६ मेट्रिक टनांवर पोहोचले आहे, जे ३१ मार्च २०२४ अखेर ४०८ मेट्रिक टनांपेक्षा अधिक होते. रिझर्व्ह बँकेने ही माहिती जाहीर केली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नावे सध्याच्या घडीला ८५५ टन सोने आहे. त्यातील सुमारे ५१० टन सोने आता भारतात असून बाकीचे बाहेरच्या देशांत आहे. बँक ऑफ इंग्लंड तसेच बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंट या दोन बँकांमध्ये भारताचे ३२४ टन सोने आहे. जगभरातील विविध देश सुरक्षिततेच्या दृष्टीने या बँकांमध्ये आपले सोन्याचे साठे ठेवतात. न्यूयॉर्क फेडरल रिझर्व्ह या बँकेत सर्वाधिक तर बँक ऑफ इंग्लंडमध्ये त्याखालोखाल सोन्याचे साठे आहेत. या बँकेत भारताखेरीज अमेरिका, जर्मनी, इटली, फ्रान्स, रशिया, चीन अशा अनेक देशांनी आपले सोने ठेवले आहे. या मध्यवर्ती बँकांमध्ये सोने ठेवल्यास त्याची तेथील विक्री सुलभ होते. लंडन येथील सोनेचांदी बाजाराशी असलेल्या आर्थिक जवळीकीमुळे बँक ऑफ इंग्लंडमध्ये सोनेसाठे ठेवण्यास विविध देश प्राधान्य देतात. अर्थात त्यात काही प्रमाणात जोखीमही असतेच. वाढत्या भू-राजकीय अनिश्चिततेदरम्यान देशातच सोन्याची साठवणूक करणे देशाच्या आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हिताचे मानले जाते आहे.**


# रायगड विधानसभा निवडणुकीतून काँग्रेसचा ‘हात’ गायब

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

एकेकाळी रायगड हा काँग्रेसचा गड होता. या जिल्ह्यात काँग्रेसची एक ताकद होती. काँग्रेसचा पराभव करण्यासाठी सर्व पक्ष एकत्र यायचे. त्याच काँग्रेस पक्षाची रायगडात पूर्ण वाताहत झाली आहे. महाराष्ट्राच्या २०२४च्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत काँग्रेस मोठा भाऊ आहे, असे त्यांचे नेते सांगत आहेत. त्याच काँग्रेसला रायगड जिल्ह्यात महाविकास आघाडीत एकही जागा सुटलेली नाही. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत रायगड जिल्ह्यात काँग्रेसचा हात गायब झाला आहे. काँग्रेसवर ही वेळ का आली? याचा विचार काँग्रसने केला पाहिजे. पूर्वी प्रत्येक मतदारसंघात काँग्रेसकडे भक्कम नेतृत्व होते. जनाधार असलेले नेते होते. या सर्वांचे नेतृत्व करणारे बॅ. ए. आर. अंतुले होते. आता काँग्रेसकडे जनाधार असलेले नेते नाहीत आणि सर्वमान्य असेल असे नेतृत्व नाही. त्यामुळेच रायगड जिल्ह्यात काँग्रेसला नेतृत्व राहिलेले नाही.

१९६१साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हापासून रायगड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा खासदार, केंद्रीय मंत्रीपद, मुख्यमंत्रीपद, विविध तालुक्यात आमदार, राज्यात कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्रीपद, महामंडळाचे अध्यक्षपद तसेच रायगड जिल्ह्यात आजवर झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत फक्त काँग्रेस पक्षानेच स्वबळावर संपूर्ण सत्ता मिळवली आहे. इतर पक्षांनी रायगड जिल्हा परिषदेची सत्ता मिळवली ती युती वा आघाडी करून. याच काँग्रेस पक्षाची अवस्था वाईट झाली आहे. ज्या मतदारसंघातून काँग्रेसचे आठ खासदार निवडून गेले आहेत त्याच काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत इतर पक्षांचा पाठिंबा घ्यावा लागत आहे. विधानसभा निवडणुकीत उमेदवार तरी उभे केले जात होते. २०२४ विधानसभा निवडणुकीत काँग्रेस रायगड जिल्ह्यात एकही जागा लढवत नाही. महाविकास आघाडीकडून काँग्रेसला रायगड जिल्ह्यात एकही जागा सुटलेली नाही. त्यामुळे काँग्रेसमध्ये नाराजी आहे. ती असणे स्वाभाविक आहे.

रायगड जिल्ह्यात काँग्रेसकडे बॅ. ए.आर. अंतुले यांच्यासारखा खमका नेता होता. बॅ. अंतुले यांच्या निधनानंतर खऱ्या अर्थाने रायगड जिल्ह्यातील काँग्रेस पोरकी झाली. ज्याचा शब्द प्रमाण मानून संपूर्ण रायगड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते काम करतील असा नेताच काँग्रेसमध्ये उरला नाही. माजी खासदार रामशेठ ठाकूर त्यानंतर माजी मंत्री रविशेठ पाटील यांनी काँग्रेसला रामराम ठोकला. त्यानंतर रायगड जिल्ह्यात काँग्रेसकडे जनाधार असलेले दोनच नेते उरले होते ते म्हणजे अलिबागचे मधुकर ठाकूर व महाडचे माणिकराव जगताप. या दोघांचेही निधन झाले. मुश्ताक अंतुले यांचा आधार होता, परंतु त्यांनीदेखील पक्ष सोडला. त्यामुळे आता रायगड जिल्ह्यात खऱ्या अर्थाने जनाधार असलेला नेताच काँग्रेसमध्ये उरलेला नाही. काही नेत्यांनी पक्ष सोडल्यामुळे रायगड जिल्ह्यातील काँग्रेस कमकुवत झाली होती. त्यात मधुकर ठाकूर व माणिकराव जगताप या दोन नेत्यांचे निधन झाले. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील काँग्रेस नेतृत्वहीन झाली आहे. त्यांच्यानंतर त्या त्या तालुक्यात त्या तोडीचे सक्षम नेतृत्व तयार झाले नाही. याचा फटका काँग्रेस पक्षाला बसला आहे. जनाधार असलेला आणि संपूर्ण जिल्ह्याचे नेतृत्व करू शकेल असा नेताच रायगड जिल्ह्यात काँगेसकडे नाही.




रायगड जिल्ह्यात पूर्वी भाजपचे अस्तित्वच नव्हते. निवडणूक लढविण्यासाठी माणसे शोधावी लागत होती, परंतु माजी खासदार रामशेठ ठाकूर भाजपात आल्यामुळे भाजपकडे पनवेल महानगरपालिकेची सत्ता आली. त्यानंतर प्रशांत ठाकूर, महेश बादली, रविशेठ पाटील हे तीन आमादर रायगड जिल्ह्यात निवडून आले. या जिल्ह्यात आता भाजपने कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले आहे. जिल्ह्यात शेकापची ताकद कमी झाली असली तरी त्यांच्याकडे जयंत पाटील यांच्यासारखे नेत्वृत्व आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे खासदार सुनील तटकरे यांच्यासारखे नेते आहेत. काँगेसकडे या जिल्ह्यात एक मंत्री नाही, आमदार नाही, खासदार नाही. जिल्हा परिषदेत सत्ता नाही, अशा प्रतिकूल परिस्थितीत रायगडात काँग्रेस तग धरून आहे.

मागील काही वर्षांत काँग्रेस नेतृत्वाने रायगडकडे दुर्लक्ष केले. बॅ. ए. आर. अंतुले यांचा पराभव झाल्यानंतर काँग्रेसने रायगड लोकसभा निवडणूक लढवली नाही. आघाडीच्या राजकाराणात आपल्या हक्काच्या रायगड लाकसभा मतदारसंघावर काँग्रेसला पाणी सोडावे लागले. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने रायगड जिल्ह्यात काही जागा लढवल्या होत्या. २०२४च्या विधानसभा निवडणुकीत मात्र काँग्रेस एकही जागा लढवणार नाही. या निवडणुकीत काँग्रेसचा ‘हात’ गायब झाला आहे. त्यामुळे कार्यकर्ते नाराज आहेत, ते संभ्रमात आहेत. पक्षाचा उमेदवारच नसेल तर काम कुणाचे करायचे? असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. काँग्रेस पक्ष निवडणूक लढवाणार नसल्यामुळे पारंपरिक मतदार दूर जात आहे. आता या जिल्ह्यात काँगेससमोर निवडणुका लढवण्याचे नव्हे तर पक्षाचे अस्तित्व टिकण्याचे आव्हान आहे.

# संगीत दिग्दर्शक, कवी, लेखक यशवंत देव

यशवंत त्र्यंबक देव यांचा जन्म १ नोव्हेंबर १९२६ रोजी पूर्वीच्या कुलाबा जिल्ह्यातील पेण येथे झाला. त्यांचे वडील त्र्यंबक गोविंद देव हे संगीतप्रेमी होते. ते स्वतः अनेक वाद्ये उत्तमरीत्या वाजवत.

यशवंत देव यांचे शालेय शिक्षण प्रथम पेण खासगी विद्यालय येथे व त्यानंतर नवीन समर्थ विद्यालय, तळेगाव, नूतन मराठी विद्यालय, पुणे आणि चिकित्सक समूह विद्यालय, गिरगाव, मुंबई अशा विविध शिक्षण संस्थांमध्ये झाले. ते १९४४मध्ये चिकित्सक समूह विद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा सर्व विषयांत प्रावीण्य मिळवून उत्तीर्ण झाले. नंतर सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई आणि राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथून १९४८मध्ये पदार्थविज्ञान आणि गणित हे विषय घेऊन त्यांनी बीएस्सीची पदवी मिळवली.

शास्त्रशाखेचे विद्यार्थी असलेल्या यशवंत देव यांनी आपली कारकीर्द विशेषत: सुगम संगीतामध्ये घडवली. त्यांच्यावर संगीताचे प्राथमिक संस्कार त्यांच्या वडिलांनी केले. त्यांच्या घरी नेहमी संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकार येत असत. त्यांचे गाणे सतत कानांवर पडत असे. नकळत घडलेल्या या संस्कारांचा त्यांच्या संगीत कारकिर्दीवर प्रभाव पडला.



देव यांनी निदान सुरुवातीच्या काळात तरी पूर्णपणे संगीताला वाहून घ्यायचे असे ठरवले नव्हते, ते आपोआप घडत गेले. पुण्याला शाळेत असताना त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला होता, पण लवकरच हे शिक्षण थांबले. स्वयंअध्ययन करून त्यांनी शास्त्रीय संगीत आत्मसात केले आणि १९६८ साली शास्त्रीय संगीताची पदवी मिळवली. नागपूर आकाशवाणीवर काम करताना त्यांनी सतारवादनामध्ये संगीत विशारद ही पदवी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होऊन मिळवली.

दीर्घकाळ आकाशवाणीवरची नोकरी देव यांच्या दृष्टीने एक प्रयोगशाळाच ठरली. काही काळ त्यांनी शिधावाटप कार्यालयात काम केले. नंतर एचएमव्ही आणि शेवटी धारवाड, मुंबई, नागपूर या आकाशवाणी केंद्रांवर तसेच ‘विविध भारती’च्या हिंदी विभागात त्यांनी कार्यक्रम निर्माता म्हणून काम केले.

आकाशवाणीवर काम करताना त्यांनी अनेक संगीतिका, नाटकांचे पार्श्वसंगीत, संगीत आणि स्वतंत्रपणे अनेक गीतांचे संगीत दिग्दर्शन केले. त्यांनी १९६१-६२मध्ये सुगम संगीताचा विशेष कार्यक्रम ‘भावसरगम’ याची निर्मिती करून मराठीतल्या अनेक कवींच्या रचना रसिकांपर्यंत पोहचवल्या. देव यांनी अनिल विश्वास यांना आपले गुरू मानले आणि त्यांच्या संगीत नियोजनातून प्रेरणा घेतली.

देव यांनी १९५७मध्ये ‘झालं गेलं विसरून जा’ या चित्रपटासाठी गीतकार-संगीतकार म्हणून प्रथम काम केले. चित्रपटांप्रमाणेच नाट्यक्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे. सहा दशकांहून अधिक काळ यशस्वीपणे चाललेल्या त्यांच्या या संगीत प्रवासात त्यांना अनेक पुरस्कार, सन्मान मिळाले.

**-संगीता बापट, आर्या जोशी**

## बदलते तंत्रज्ञान

### इन्स्टा रीलसवरील व्हायरल गाणं असं अ‍ॅड करा लिस्टमध्ये

इन्स्टाग्राम, यूट्यूब, टिकटॉक, फेसबुकसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर रील व्हिडीओ खूप लोकप्रिय आहेत. रीलमध्ये किंवा पोस्टमध्ये एखादं नवीन गाणं ऐकलं की, सगळ्यात पहिले आपण त्याचे नाव शोधण्यास सुरुवात करतो, पण कधी कधी काही केल्या ते सापडत नाही, त्यामुळे आता इन्स्टाग्राम टिकटॉकवरून एक फीचर कॉपी करत आहे, जे युजर्सना इतर लोकांच्या पोस्ट, रील आणि शॉर्ट्सर्समधून गाणे त्यांच्या Spotify प्लेलिस्टमध्ये जोडण्याची परवानगी देत आहे.



एक्सवरील अलीकडील पोस्टमध्ये इन्स्टाग्रामने घोषणा केली की, इन्स्टाग्रामच्या प्रत्येक युजर्ससाठी हे फीचर आणत आहे. तुम्ही इन्स्टाग्रामवर नवीन गाणे ऐकलं असेल व ते तुम्हाला अ‍ॅप न सोडता तुमच्या स्पॉटिफाई प्लेलिस्टमध्ये जोडायचं असेल तर तुम्ही सोप्या स्टेप्स फॉलो करून ते करू शकता.

इन्स्टाग्रामवरून स्पॉटिफाईमध्ये गाणे कसे जोडायचे?

१. इन्स्टाग्राम रील, पोस्ट किंवा स्टोरीमध्ये तुम्ही ऐकलेले गाणे स्पॉटिफाईमध्ये जोडण्यासाठी, गाण्याच्या नावावर टॅप करा. तुम्हाला ऑडिओ प्लेयरच्या उजव्या बाजूला स्क्रीन दिसेल, जिथे एक Add बटण असेल, ज्याच्या जवळ एक स्पॉटिफाय आयकॉन असेल.

२. Add बटणावर क्लिक केल्यानंतर इन्स्टाग्राम तुम्हाला तुमच्या अकाउंटला स्पॉटिफाईशी लिंक करण्यास सांगेल.’ Link Spotify’वर टॅप करा. निवडल्यानंतर ते गाणं थेट तुमच्या स्पॉटिफाय प्लेलिस्टमध्ये जोडले जाईल.

इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सच्या तुलनेत ढळझढेझ मध्ये युजर्स त्यांच्या आवडत्या गाण्यांना मल्टिपल म्युझिक स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्ममध्ये जोडू शकतात. इन्स्टाग्राममध्ये फक्त स्पॉटिफाई हाच एक पर्याय उपलब्ध असेल, त्यामुळे जर तुम्ही यूट्यूब म्युझिकसारख्या दुसरा म्युझिक स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म वापरत असाल, तर इन्स्टाग्रामचे हे फीचर तुमच्यासाठी उपयुक्त नसू शकतो.

इन्स्टाग्रामने गेल्या काही आठवड्यात अनेक नवीन फीचर्स जोडले आहेत. या नव्या सुविधांमध्ये एक नवीन कस्टमायझेबल प्रोफाइल कार्ड आणि प्लॅटफॉर्मवरील जाहिरातदारांसाठी AI व्हिडीओ फीचर्स समाविष्ट करण्यात आले आहे. यामुळे वापरकर्त्यांना अधिक सोयीस्कर आणि आकर्षक अनुभव मिळेल.

# विनोदी अभिनेते शरद तळवळकर

साधे-सरळ, सुशील आणि एकमार्गी असणारे, मराठी चित्रपटसृष्टीवर हास्याची लकेर उमटविणारे तसेच आपल्या कामाशी एकनिष्ठ राहिलेले दिग्गज अभिनेते म्हणजेच शरद गणेश तळवलकर. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर, १९१९ रोजी झाला. शालेय जीवनात म्हणजे पुण्याच्या भावे स्कूलमध्ये ऐनवेळेस ‘शिशुपाल’ आणि ‘साष्टांग नमस्कार’ या नाटकातील ‘भद्रायू भाटकर’ ही पात्रं त्यांनी अतिशय सुंदर रीतीने रंगविली होती. विशेष म्हणजे शाळेत असताना ते शिक्षकांच्या नकला हुबेहूब करायचे.

प्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांनी एका अभिनेत्याच्या अभिनयाचे मार्मिक वर्णन करून ठेवले आहे. ते म्हणतात, हा माणूस इतका साधा आहे की, यांच्या नावात काना, वेलांटी, उकार काहीच नाही हो. अभिनयातील सहजता हा दुर्मिळ गुण या कलाकारामध्ये आहे. आपलं बोलणं विनोदी करायला त्याला कसलीही युक्ती वापरावी लागत नाही. नाटककाराने लिहिलेला संवाद पुरेसा हशा पिकविणारा नाही, या समजुतीने काही विनोदी नट आपली विनोदबुद्धी वापरतात, नको त्या ठिकाणी नको इतके अंगविक्षेप करतात. हशा पिकविण्यासाठी या कलाकाराला यापैकी कशाचीच गरज भासली नाही.




**निमित्त**

१९३५ साली ‘रणदुंदुभी’ नाटकात शिशुपालाची भूमिका करणारा कलाकार ऐन वेळी अडला आणि शरद तळवलकरांनी आपल्या अभिजात कलागुणांनी त्या भूमिकेत कमालीचा रंग भरला. तेव्हापासून दरवर्षी स्नेहसंमेलनाच्या नाटकात त्यांच्यासाठी आग्रह धरला जाऊ लागला. इथूनच त्यांच्या रंगभूमीच्या प्रवासाला सुरुवात झाली. नटश्रेष्ठ केशवराव दाते यांच्या पाहण्यात त्यातील एक भूमिका आली आणि त्यांच्या नाट्य विकास संस्थेत त्यांनी तळवलकरांना निमंत्रण दिले. नाटकात कामे करणे ही त्या काळात फारशी समाजमान्य गोष्ट नव्हती. वडिलांनी नाटक कंपनीत जाण्यास विरोध केल्यानंतर नाटकाच्या वेडापायी शरद तळवलकरांनी घर सोडले. अभिनयाबाबत मार्गदर्शन घेण्यासाठी ते कोल्हापूरला मास्टर विनायक यांच्या ‘हंस पिक्चर्स’मध्ये बाबूराव पेंढारकरांना भेटले. त्यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी आधी शिक्षण पूर्ण करायचे ठरवून जोडीला अकाउंटंटची नोकरी पत्करली. महाविद्यालयाच्या नाटकांतूनही त्यांच्या भूमिका प्रेक्षकप्रिय झाल्या. व्यावसायिक नाटकांतून भादव्या, फाल्गुनराव, कामण्णा, तळीराम, धैर्यधर अशा भूमिका शरद तळवलकर करू लागले. १९५२ साली गाजलेल्या ‘पेडगावचे शहाणे’ आणि ‘लाखाची गोष्ट’ या राजा परांजपे दिग्दर्शित चित्रपटांत त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. तसेच दत्ता धर्माधिकारी यांच्या ‘अखेर जमलं’ या चित्रपटात लक्षात राहण्याजोगी भूमिका मिळाली.

‘छापील संसार’ नावाच्या पहिल्या व्यावसायिक नाटकात त्यांनी काम केले. हा अभिनयाचा छंद जोपासत असताना त्यांनी मिलिटरी अकाऊंट्समध्ये नोकरी केली. त्यावेळेस त्यांचे शिक्षणही सुरू होते. विनोदी अभिनेता म्हणून त्यांनी केलेला पहिला चित्रपट होता ‘माझा मुलगा.’ तिथून सुरू झालेला विनोदी अभिनेत्याचा प्रवास शेवटपर्यंत सुरूच होता. नाट्य आणि चित्रपट दोन्ही क्षेत्रात त्यांनी आपल्या अभिनयाचा प्रभाव पाडला. अशा या चतुरस्त्र अभिनेत्याचे २२ ऑगस्ट २००१ रोजी निधन झाले. (सभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**




पनवेल : दीपावलीनिमित्त मिडलक्लास हौसिंग सोसायटीचा परिसर रात्रीच्या वेळी रोषणाईने उजळून निघतो.

## आरोग्य प्रहर

### अन्नाबरोबर पाणी प्यायल्याने गॅस किंवा अपचन होऊ शकते का?

पचनाच्या आरोग्याचा विचार केला तर अनेक समज आणि गैरसमज अनेकांच्या मनात असतात. एक सामान्य समज असा आहे की, अन्नाबरोबर किंवा नंतर पाणी प्यायल्याने पोटातील अ‍ॅसिड्स पातळ होऊ शकतात, ज्यामुळे ते अन्न बारीक करण्यास कमी परिणामकारक बनतात, ज्यामुळे पचनशक्ती बिघडते आणि ब्लोटिंग आणि गॅससारख्या इतर समस्या उद्भवतात.



डॉ. राकेश गुप्ता, इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्स, नवी दिल्ली, अंतर्गत औषध विशेषज्ज्ञ यांच्या मते, सत्य हे आहे की पोटातील अ‍ॅसिड हे पाण्याच्या सेवनाकडे दुर्लक्ष करून प्रभावीपणे कार्य करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. योग्य हायड्रेशन राखण्यासाठी पाणी पिणे आवश्यक आहे आणि ते पचनास अडथळा आणण्याऐवजी खरोखर मदत करू शकते.

पाचक आरोग्यासह संपूर्ण आरोग्यासाठी हायड्रेशन अत्यावश्यक आहे. जेव्हा तुम्ही जेवणापूर्वी, जेवणाच्या दरम्यान आणि नंतर पाणी पिता, तेव्हा ते पचनात अनेक प्रकारे मदत करते. पाणी पोषक तत्वांचे विघटन करण्यास मदत करते आणि पोटातील एन्झाइमॅटिक प्रक्रियेस समर्थन देते. हे पचनसंस्थेचे कार्य सुरळीत ठेवते, बद्धकोष्ठतेचा धोका कमी करते. पचनानंतर संपूर्ण शरीरात पोषक द्रव्ये वाहून नेण्यास पाणी मदत करते.

पोट हा एक स्नायूचा अवयव आहे, जो मोठ्या प्रमाणात अन्न आणि द्रव सामावून घेण्यासाठी डिझाइन केलेला आहे. जेव्हा तुम्ही खाता किंवा पिता तेव्हा शरीरात येणारे पदार्थ सामावून घेण्यासाठी पोटाचा विस्तार होतो. पाणी पोटात जाते आणि त्यातील घटकांमध्ये मिसळते, परंतु ते गॅस्ट्रिक ज्यूसच्या एकूण अ‍ॅसिडिटीमध्ये लक्षणीय बदल करत नाही.

पाणी प्यायल्याने अन्न नरम होण्यास मदत होते, ज्यामुळे पोटाला ते पचवायला सोपे जाते. पाणी तुम्हाला पोट भरण्यास मदत करू शकते, ज्यामुळे अधिक खाणे तुम्ही टाळू शकता, टाळता आणि वजन नियंत्रणात मदत होते. पाणी तुमच्या चवीला ताजेतवाने करते, अन्नाची चव वाढवू शकते आणि तुमच्या जेवणाचा अनुभव अधिक आनंददायी बनवते.

जर तुम्हाला सतत पचनाच्या समस्या येत असतील, तर हेल्थकेअर प्रोफेशनलचा सल्ला घेणे नेहमीच चांगली कल्पना असते. पाणी आणि पोटातील आम्ल यांच्यातील संबंध समजल्याने तुम्ही तुमच्या आहाराबाबत योग्य निर्णय घेऊ शकता.

(टीप : दिनचर्येत कोणताही बदल करण्यापूर्वी नेहमी आपल्या आरोग्य चिकित्सकाचा सल्ला घ्या.)

# रामराज येथे महायुतीची सभा उत्साहात

## आमदार महेंद्र दळवींचे विरोधकांना आक्रमक चिमटे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रामराज येथे महायुतीचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रचारार्थ सभा मोठ्या उत्साहात झाली. या सभेत आमदार महेंद्र दळवी यांनी मार्गदर्शन भाषण करताना विरोधकांना आक्रमक चिमटे घेतले.



रामराज-बेलोशी जि.प. गटातील महायुतीचे आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रचारार्थ बुधवारी रात्री रामराज नाक्यावर घेण्यात आली. या सभेत आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीसह शिवसेना जिल्हा प्रमुख राजा केणी, नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, खजिनदार सुरेश म्हात्रे, रोहा तालुका प्रमुख अॅड मनोजकुमार शिंदे, अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, अॅड विलास नाईक तसेच भाजप जिल्हा सरचिटणीस अॅड महेश मोहिते, माजी तालुका अध्यक्ष हेमंत दांडेकर, तालुका अध्यक्ष उदय काठे, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सचिव आशिष भट, रा.कॉ. विधानसभा संघटक अमित नाईक, जि.प. माजी सदस्य बाळाशेठ तेलंगे, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. सभेचे नियोजन युवासेना जिल्हा समन्वयक अजय गायकर व सहकारी यांनी केले होते.

प्रारंभी आमदार महेंद्र दळवींचे मोठ्या दिमाखदार स्वागत मिरवणूकीने व फटाक्याचे आतषबाजीने करण्यात आली. त्यानंतर दिपप्रज्वलन व प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण उपस्थितांनी केले. प्रारंभी युवासेना समन्वयक अजय गायकर व रामराज विभागीय शिवसेना कार्यकर्ते यांचे हस्ते शाल, श्रीफळ व भव्य पुष्पमालिका अर्पण करून स्वागत-सत्कार करण्यात आला. त्यानंतर भोनंग, कावीर व परिसरातील विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश कार्यक्रम घेण्यात आला त्याचे स्वागत आमदार महेंद्र दळवी यांनी केले.

या वेळी सभेचे प्रास्ताविक अरूण भगत, तसेच हेमंत दांडेकर, अॅड. मनोज शिंदे, माजी जि.प.सदस्य बाळाशेठ तेलंगे, रा.कॉ.चे अमित नाईक, शिवसेना जिल्हा अध्यक्ष राजा केणी, भाजप सरचिटणीस अॅड महेश मोहिते यांची उपस्थित सभेत प्रचारार्थ भाषणे झाली. त्यानंतर आमदार महेंद्र दळवी यांनी प्रचारार्थ भाषण करताना रामराज व परिसराचे मुलभूत प्रश्न सोडविण्याचा निश्चित प्रयत्न केला तसेच अलिबाग ते रोहा रस्ता ठेकेदार ब्लॅकलिस्ट मध्ये गेल्याने रखडले परंतू येत्या काही दिवसात चांगल्या दर्जाचा रस्ता होईल असे आश्वासन दिले. तरूणाच्या नोकरीसाठी उसर येथील गेल व एचपिसिएल या औद्योगिक कंपनीत संधी मिळणे गरजेचे होते, परंतु कंपनी बंद पडल्याने

हे काम रेगांळले मात्र नव्याने येणार्या गेल कंपनीचे चेअरमन विदयमान खासदार सुनील तटकरे असल्याने नोकरीच्या अटी व शर्ती यामध्ये निश्चित बदल करून संधी मिळेल असे आश्वासन दिले. रामराज परिसरात एखादा प्रोजेक्ट आणण्यासाठी निश्चित प्रयत्न केले, मात्र अलिबाग तालुक्यात एखादा प्रोजेक्ट आला की विरोध होतो ही दुर्दैवाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी त्यांनी बॅ. अंतुले साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याचे भाग्य विविध विकास कामे पुर्ण करताना मिळाले असल्याचे सांगितले.

सायकलने निवडणुक अर्ज दाखल करणाऱ्या शेकाप उमेदवारास सायकल प्रवास म्हणजे सिनेमाची शुंटीग अशी टिका केली. शेवटी परिसराचा विकास करण्यासाठी कटिबध्द असून रामराज विभाग दत्तक घेत असल्याची घोषणा महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र दळवी यांनी दिली व मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे आवाहन केले.

# गुरांच्या गोठ्यासमोर असलेल्या विजेच्या खांबाचा शॉक लागल्याने बैलाचा मृत्यू

## शेतकरी चिंताग्रस्त

**खोपोली : प्रतिनिधी**

घर तेथे विजेचा पोल हे प्रत्येक ठिकाणी समिकरण आपणांस पहावयांस मिळत आहे, मात्र काही वेळा हेच पोल गुरांनसाठी जिवघेणी ठरत आहे. माजगांव येथे राहणारे महेश पाटील (ढवाळकर) यांच्या घराच्या पाठीमागे गुरांचा गोठा असून त्याच ठिकाणी एक विजेचा पोल असून या मुक्या प्राणी या पोलाच्या संपर्कात येताच त्यांचा जागीच मृत्यू झाल्यांने कुटुंबावरती दुखाचे सावट पसरले आहे. भात शेतीची कामे सुरू असतांना ही दुर्दैवी घटना घडल्यामुळे येथील ग्रामस्थ चिंताग्रस्त झाले आहे.

बैलाला विजेचा धक्का लागताच बैल जागेवरचा त्यांचा मृत्यू झाला. या ठिकाणी असलेले ग्रामस्थ यांनी त्यांस वाचविण्यांचा खूप प्रयत्न केला, मात्र यशस्वी झाला नाही. विषेश म्हणजे दिवाळी सण असल्यामुळे लहान मुले याच ठिकाणी खेळत असतात. सुदैवाने मुले या पोलाच्या संपर्कात न आल्यामुळे वाचले मात्र या मध्ये मुका प्राण्यांचा नाहक बळी गेला. वृत्त या पंचक्रोशीत वाऱ्यासारखी पसरली तलाठी, पशु वैद्यकीय अधिकारी तसेच एम.एस.ई.बी च्या कर्मचारी यांनी तातडीने विज पुरवठा खंडीत करून विज प्रवाह सुरळीत चालु ठेवला.



**बैल शेतावरुन घरी येत असतांना घराच्या पाठीमागे गोठा असून याच ठिकाणी विजेचा पोल आहे.मात्र यांच्या संपर्कात येताच विजेचा शॉक लागला तसेच आम्ही त्यांस बाजुला करण्यांचा प्रयत्न केलास आम्हाला सुद्धा विजेचा धक्का बसत होता.**

**-महेश पाटील-ढवाळकर, बैल मालक, माजगाव**

**विजेचा शॉक लागला असून बैलाचा मृत्यू पोस्ट मॉटम रिपोर्ट मध्ये नमुद झाल्यास आम्ही शेतकरी वर्गांस नुकसान भरापाई देण्यांचा प्रयत्न करू.**

**-अभिजित बोधनकर, एम.एस.ई.बी अभियंता, चौक**

**माजगाव येथे बैलाचा मृत्यू झाल्यांची माहिती आम्हास मिळाली असता आम्ही त्या ठिकाणी जावून तातडीने पोस्ट मॉटम केले असता. विजेच्या धक्यांने मृत्यू झाल्यांचे समोर आले असून तसा अहवाल आम्ही पुढे पाठविणार आहोत.**

**-प्रशांत कोकरे, पशु वैद्यकीय अधिकारी**

सध्या शेतीचे काम सुरू असतांना शेतकरी वर्गांचा बैल विजेच्या धक्याने मृत्यू झाल्यामुळे आता शेतातील चिंताग्रस्त झाला. आपल्या गोठ्यात असलेले गुरांच्या वरती शेतकरी मुलाप्रमाणे प्रेम करीत असतो.कारण शेतीच्या कामात मोठे योगदान असल्यामुळे त्यांचे श्रम कमी होत असते, असे मत उपस्थित ग्रामस्थ आणी शेतकरी वर्गांनी व्यक्त केले.

# पालीतून कर्णकर्कश हॉर्न वाजवणाऱ्यांवर कारवाईची मागणी

## पोलीस अधिक्षकांना निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

मागील काही वर्षे लक्ष्मी पूजनाचे दिवशी शहरातील मुख्य रस्त्यावरून दुचाकी व चारचाकी वाहने कर्णकर्कश्श हॉर्न वाजवत मोठ्या संख्येने एकत्रित पणे फिरवण्याची कुप्रथा सुरू झाली आहे, असे करणाऱ्यांवर आवर घालण्याची मागणी पालीतील काही नागरिकांनी केली असून याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनदेखील दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, लक्ष्मी पूजनाचे दिवशी गावातील आबाल वृद्ध, नागरिक मोठ्या प्रमाणावर खरेदी साठी तसेच श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेण्यासाठी रस्त्यावरून चालत असतात तसेच लहान मुले घरासमोर फटाके फोडत असतात. अशावेळेस २० ते २५ जणांच्या समूहाने कर्णकर्कश्श हॉर्न वाजवत वेगाने फेरी मारताना ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण होऊन सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. दोन वर्षांपूर्वी लक्ष्मी पूजनाचे दिवशी अशीच फेरी मारत असताना एका अल्पवयीन मुली कडून चारचाकी चालवत असताना अपघात होऊन मोठा अनर्थ झाला होता. तरी गेल्या वर्षी प्रमाणे या वर्षी देखील लक्ष्मीपूजनाचे दिवशी शुक्रवारी पालीतील मुख्य चौकांमध्ये, बल्लाळेश्वर गणपती मंदिर चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, महाकाली मंदिर चौक व गांधी चौक येथे वाहतूक पोलिसांची नेमणूक करून सामान्य नागरिकांना होणारा नाहक त्रास आटोक्यात आणावा असे म्हटले आहे.

निवेदन पालीतील नागरिक कपिल पाटील यांनी दिले असून अॅड. स्वराज मोरे यांसह अनेक नागरिकांनी याला पाठिंबा दर्शवला आहे.

# निवडणूक निरीक्षकांनी घेतला निवडणूक कामकाजाचा आढावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने नियुक्त निवडणूक निरीक्षक यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला. निवडणूकीची सर्व प्रक्रिया निर्भय, भयमुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी सर्व नोडल अधिकाऱ्यांनी सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडावी, असे सर्वांनी यावेळी स्पष्ट केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित विधानसभा निवडणूक कामकाज आढावा बैठकीला निवडणूक निरीक्षक (सामान्य) दुनी चंद राणा, संतोष कुमार राय, रुही खान, सतीश कुमार एस, पोलीस निरीक्षक स्वप्नील ममगाई, खर्च निरीक्षक राजेश कुमार, ज्योती मीना, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांसह सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे यांनी निवडणुकीच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दिली. स्थिर पथके व फिरती पथके आवश्यक त्या ठिकाणी उपलब्ध आहेत. आंतरराज्य व जिल्ह्याच्या सीमेवर पुरेसा पोलीस व निवडणुक यंत्रणाचा कर्मचारी वर्ग २४ तास तपासणी नाक्यावर उपस्थित आहे. बॅरिकेट्स व सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात आली असून अधिकारी व कर्मचारी प्रत्येक वाहनाची तपासणी करून रोख रक्कम, मद्य वाहतूक होत आहे का तसेच संशयास्पद बाबीवर लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील मतदार संघातील मतदान केंद्र, मतदार, क्रिटिकल मतदान केंद्र, मतदान प्रक्रियेसाठी लागणारे मनुष्यबळ, क्षेत्रीय वाहतूक नियोजन याबाबतची माहिती श्री जावळे यांनी या वेळी दिली.

निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने आयोगाच्या निर्देशांनुसार अपेक्षित कार्यवाही याबाबत मार्गदर्शन केले व आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच सर्व नोडल अधिकारी यांच्याकडून निवडणुकीच्या तयारीची माहिती जाणून घेतली.

# पेब किल्ल्यावरून बारा ट्रेकर्सची सुटका

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या शेजारील शिवकालीन पेब किल्ला म्हणजेच विकटगड येथे ट्रेकिंगसाठी आलेले १२ ट्रेकर्स रस्ता सापडला नसल्याने हरवले होते. या सर्व तरुणांनी पोलीस हेल्पलाईनकडे मदत मागितली असता नेरळ पोलिसांनी पायथ्याशी असलेल्या आनंदवाडीमधील स्थानिक आदिवासी तरुणांच्या मदतीने पेब किल्ला येथे अडकलेल्या १२ ट्रेकर्स यांची सुखरूप सुटका केली.



माथेरानच्या डोंगराला लागून असलेला पेब किल्ला म्हणजेच विकटगड या किल्ल्यावर पर्यटक व ट्रेकर्स पर्यटन तसेच ट्रेकिंगसाठी जात असतात. मंग.२९ ला घाटकोपर मुंबई येथील १२ जणांचा ग्रुप नेरळ येथून ट्रेकिंगसाठी रवाना झाला होता. ग्रुपमध्ये पाच मुली पण होत्या. सध्या पेब किल्ल्यावर गवत वाढले असल्याने पायवाटा अस्पष्ट झाल्या आहेत. ट्रेकिंगसाठी जाताना कोणत्याही प्रकारचा गाईड यांची मदत न घेता हे सर्व तरुण किल्ल्यावर पोहचले होते. येथील पावसाळ्यात वाढलेल्या गवतामुळे पेब किल्ल्यावरील नेहमीच्या पायवाटा दिसून येत नव्हत्या त्यामुळे ते रस्ता चुकले. दुपारी दोनपासून त्या ग्रुपला खाली उतरण्यासाठी रस्ता आढळून येत नव्हता. त्यामुळे रस्ता चुकलेले ट्रेकर्स गवतामुळे भरकटले. साधारण २० वर्षे वयोगटातील सर्व ट्रेकर्स असल्याने ते सर्व तरुण तरुणी घाबरले होते. शेवटी त्यांनी साडेचार वाजता पोलीस हेल्पलाईन सोबत संपर्क केला. त्यात संबंधित कॉल पोलीस हेल्पलाईन वरून नेरळ पोलीस यांच्याकडे पोहचला.

पेब किल्ल्यावर कोणी ट्रेकर्स ग्रुप रस्ता भरकटले असल्याची माहिती नेरळ पोलीस यांना मिळताच नेरळ पोलिसांनी तत्काळ पेब किल्ल्याचे पायथ्याचे गाव असलेल्या आनंदवाडी येथे जावून मदत देण्यास सुरुवात केली. या किल्ल्याच्या वाटा आणि किल्ल्याचा परिसर यांची माहिती असलेले तरुण सुरेश निरगुडा, आकाश निरगुडे आणि रवी आगीवळे यांच्या जोडीला पोलीस हवालदार महेश खंडागळे आणि पोलीस शिपाई निरंजन दवणे यांनी आनंदवाडी येथून पाच वाजता किल्ल्यावर जाण्यास सुरुवात केली.

शेवटी किल्ल्यावर पोहचून त्या सर्व १२ तरुणाचा शोध या आदिवासी तरुणांनी घेतला आणि त्यानंतर साधारण साडे आठ वाजता रस्ता चुकलेले सर्व ट्रेकर्स हे आनंदवाडी येथे सुखरूप पोहचले. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्यासमोर त्या सर्व तरुणांना बसवून त्यांचा शोध लागला असल्याची माहिती पोलीस हेल्पलाईन यांना देण्यात आली. सव्वा नऊ वाजता सर्व तरुणांना दोन रिक्षांमधून नेरळ पोलीस ठाणे येथून नेरळ रेल्वे स्थानकात उपनगरीय लोकल पकडण्यासाठी सोडण्यात आले.

# हातरीक्षा ओढताना चालकाचा मृत्यू

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये हातरीक्षा ओढताना एका आदिवासी हातरीक्षा चालकाचा ह्रदय विकारच्या झटक्याने दुर्दैवी मृत्य झाल्याची घटना शहरात घडली आहे. परशुराम उर्फ काळूराम पिरकट (वय ४५) असे मृत व्यक्तीचे नाव असून चौक येथील निंबरवाडी आदिवासी वस्तीमधील ते रहिवाशी होते.



माथेरान पर्यटनस्थळी ब्रिटिशकाळापासून वाहनांना बंदी असल्याने याठिकाणी अंतर्गत वाहतुकीसाठी येथे हातरीक्षा आणि घोडे हेच प्रमुख वाहन आहेत. दुर्दैवाने माणसाने माणसाला ओढणारी हातरीक्षाची अमानवीय प्रथा शहरात आजही सुरू आहे.चौक निंबरवाडी गाव येथील परशुराम पिरकट वय वर्ष ४५ हे माथेरानमध्ये मागील अनेक वर्षांपासून हातरीक्षा ओढण्याचे काम करत होते. गुरुवारी रस्त्यावर हातरीक्षा ओढत असताना हॉटेल शालिमार जवळ त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले त्यांना त्वरित रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

हातरीक्षा ओढत असताना त्या व्यक्तीच्या ह्दयावर हा प्रचंड ताण पडत असतो. हाच ह्दयावर पडलेला ताण यामुळे ह्दयविकाराच्या झटक्याने पिरकड यांचा मृत्यू झाला, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

या अमानवी प्रथेतून मुक्ती मिळावी याकरिता हातरीक्षा चालकांनी ई-रिक्षाची मागणी केली आहे. आतापर्यंत फक्त२०ई-रिक्षा चालकांना परवानगी मिळाली असून अद्याप ७४ हातरीक्षा चालक ई-रिक्षा च्या प्रतीक्षेत आहेत. उर्वरित ७४ हातरीक्षा चालकांना सनियंत्रण समितीने ई-रिक्षाची परवानगी लवकर द्यावी, अशी मागणी या वेळी रिक्षा संघटनेचे सचिव सुनिल शिंदे यांनी केली.

# श्रीवर्धन मतदारसंघामध्ये १३ उमेदवारी अर्ज दाखल

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण १३ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून अपक्षांचीदेखील गर्दी आहे. शेवटच्या दिवशी श्रीवर्धन उपविभागीय कार्यालय या ठिकाणी कार्यकर्त्यांची व उमेदवारांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत होती.

अर्ज भरणाऱ्यांमध्ये आदिती वरदा सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट, राजेंद्र मधुकर ठाकूर, नॅशनल काँग्रेस, फैसल अजिज पोपेरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, अश्विनी उत्तम साळवि, बहुजन समाज पार्टी, अनिल दत्ताराम नवगणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, स्वाती अनिल नवगणे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, संतोष तानाजी पवार, अपक्ष, कृष्णा पांडुरंग कोबनाक, बळीराज सेना, युवराज प्रकाश भुजबळ, अपक्ष, मोहम्मद कासिम बुराहउद्दिन सोलकर, अपक्ष, ज्ञानदेव मारुती पवार, अपक्ष, अनंत बालोजी गीते, अपक्ष, इत्यादी सर्व उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

अर्ज मागे घेण्याच्या दिवशी श्रीवर्धन विधानसभा क्षेत्राचे चित्र स्पष्ट होईल. २०१९ साली झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आदिती तटकरे यांनी जवळजवळ ३९ हजार मतांनी विजय संपादन केला होता. त्यांच्यासमोर शिवसेनेचे विनोद घोसाळकर उभे होते. घोसाळकरांना त्यावेळेस दारुण पराभव पत्करावा लागला होता. आदिती तटकरे या महायुतीकडून निवडणूक लढवत आहेत. त्याच्यामुळे शिवसेना शिंदे गट, भाजप यांचादेखील त्यांना पाठिंबा मिळणार आहे. अनिल नवघणे हे अगोदर शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत होते, परंतु अनिल नवगणे यांना श्रीवर्धन आणि म्हसळा या तालुक्यांमध्ये फारसा प्रतिसाद मिळेल असे दिसत नाही.

श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रामध्ये श्रीवर्धन, म्हसळा, तळा हे तिन्ही तालुके पूर्ण असून रोहा व माणगाव तालुक्यातील एकेक मंडळ क्षेत्र विधानसभेत जोडलेले आहे. उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांमधून किती अपक्ष किंवा पक्षाच्या चिन्हावर लढणारे उमेदवार आपला अर्ज मागे घेतात यावर श्रीवर्धन मतदारसंघातील चित्र स्पष्ट होणार आहे.

**निविदा सुचना**

पुष्पव्हॅली को.ऑप.हौ. सोसायटी

Reg No : RGD/PWL/HSG/TC/२२६३/वर्षे २००९

गट क्र. १७५/१, १७५/२/A/२, १७५/२/B, १७६

सोसायटी मंदिर दुरुस्ती व रंगकाम

ससोसायटी मंदिर दुरुस्ती व रंगकाम बाबत रजिस्टर्ड कॉन्ट्रक्टर कडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची माहिती मिळवण्यासाठी खालील पत्यावर दि. १५/११/२०२४ पर्यंत संपर्क करावा.

SBI बँकेच्या बाजूला विचुंबे गाव नवीन पनवेल, रायगड

**सही/-** **चेअरमन** | **सही/-** **सेक्रेटरी**

पुष्पव्हॅली को.ऑप.हौ. सोसायटी-विचुंबे

# नेरूळ रेल्वेस्थानकात भिकाऱ्यांचा वावर

## कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा संपला आहे तसा नेरूळ रेल्वे स्थानकात दिवसा व रात्रीच्या वेळी रेल्वेस्थानकाच्या परिसरामध्ये आणि फलाटावर भिकारी व बेघरांचा वावर वाढला आहे. या बेघरांनी रेल्वे स्थानकात व परिसरात ठाण मांडल्यामुळे येणारे जाणारे प्रवासी व रेल्वे स्थानकात गाळे असलेले दुकानमालकही हैराण झाले आहेत. यावर रेल्वे पोलीस आणि सिडको सुरक्षारक्षकांनी कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.



नेरूळ रेल्वेस्थानकाच्या बाहेर रात्रीच्या वेळी परिसर महिला प्रवाशांकरिता असुरक्षित ठरत आहे. दरम्यान, रेल्वे पोलिसांकडून कोणतीही प्रतिबंधात्मक कारवाई होताना दिसत नाही. नवी मुंबई शहरातील सर्वच रेल्वेस्थानकात आणि परिसरात भिकारी, बेघर यांनी आपले संसार थाटले आहेत, मात्र नेरूळ रेल्वेस्थानकात रात्री ९ ते १० वाजले की फलाट आणि तिकीट खडकीजवळ भिकारी बेघर आपले बस्तान मांडतात. काही जण दिवसभर आपले ठाण मांडून असतात. त्याच ठिकाणी जेवण करून अस्वच्छता करतात. फलाटावरसुद्धा अंथरूण टाकून झोपलेल्याचे दृश्य पाहावयास मिळते.

दरम्यान, आधुनिक काळात नोकरदार महिलांना रात्री उशिरा प्रवास करावा लागतो. रेल्वे डब्यांमध्ये महिलांना सुरक्षा पुरवली जाते, मात्र रेल्वे स्थानक परिसर आणि फलाटावर सुरक्षा रक्षक नसल्याने असुरक्षेची भावना त्यांच्यात आहे.

रात्रीचा प्रवास करणाऱ्या महिलांना मद्यपी व गर्दुल्ले यांच्याकडून त्रास होत असतो. याबाबत अनेकदा वेळेअभावी प्रत्यक्ष तक्रार होत नसल्याने रेल्वे पोलीस कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करतात, असे प्रवाशांकडून बोलले जात आहे. रेल्वेस्थानकाबाहेर बकालपणा आला असून वेगवेगळे गैरप्रकार घडत असून भांडण तंटे, शिवीगाळ असे अनेक प्रकार सरार्सपणे सुरू असल्याने कारवाईची मागणी होत आहे.

> **रेल्वे पोलीस दल आणि सिडको सुरक्षा रक्षक अशा घटकाविरोधात वारंवार कारवाई करित असते. नेरूळ रेल्वे स्थानक परिसरात उपद्रव करणाऱ्यांवर कारवाई करावी, असे सिडको प्रशासनास लेखी स्वरुपात कळविले आहे .**
>
> **-एस.एम.नायर, स्टेशन अधीक्षक, नेरूळ रेल्वेस्थानक**

# निवडणुकीसाठी पनवेल पोलिसांची धडक कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुका पोलिसांनी मोठ्या प्रमाणात त्यांच्या हद्दीमध्ये विविध ठिकाणी कारवाई केली आहे.

तालुक्यातील चिंध्रण गावाजवळ बेकायदेशीररित्या सार्वजनिक ठिकाणी जाण्या-येण्याच्या मार्गावर फुटपाथवर दुसऱ्याच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे खाद्यपदार्थाची हातगाडी लावणार्याविरोधात कारवाई करून तो वापरत असलेली लोखंडी शेगडी ताब्यात घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे बारवई जवळच्या बालाजी पेट्रोल पंपाच्या जवळ असलेल्या हॉटेलमधून बेकायदेशीररित्या व विना परवाना देशी दारू विक्रीस ठेवल्याप्रकरणी कारवाई करून तेथून देशी दारू, संत्रा, जीएम आदींच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

वावंजे रेहमान नगर येथे एका व्यक्तीकडे एक स्टीलचा धारदार शस्त्र आढळून आल्याने त्याला ताब्यात घेवून त्याच्याकडून शस्त्र हस्तगत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वावंजे-मोर्बे रोडवर अशाच प्रकारे चायनिज दुकान चालवून हयगयीने व बेदरकारपणे आगीबाबत निष्काळजीपणा बाळगल्याबाबत पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

उलवे येथुन एका आफ्रिकन व्यक्तीस कोकेन हा अमली पदार्थ विक्रीसाठी बाळगला म्हणुन अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखेने अटक केली आहे.

गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, आर.एन. हाइट्स बिल्डींग, प्लॉट नं. २०, रूम नंबर १०१, सेक्टर २५ ए, उलवे, नवी मुंबई येथे एका आफ्रिकन व्यक्तीने कोकेन हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर रित्या बाळगला आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचुन छापा टाकला असता जार्ज ओकान्टे डासिल्व्हा (वय ३५, मुळ रा. गीनी देश) याने त्याचे घरातील बेडरूममध्ये ठेवलेल्या मरून रंगाच्या बॅगमधुन एकुण ४१० ग्रॅम वजनाचा १,०२,५०,००० रुपये किंमतीचा कोकेन हा अमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशिररित्या त्याचे ताबे कब्जात ठेवलेला मिळुन आला.




त्याच्या ताब्यात एक मोबाईल, काळा एक टॅनीटा कंपनीचा वजनकाटा, एक कात्री, १० पारदर्शक प्लॅस्टीकच्या पिशव्या, एक स्काय बॅग एकुण अंदाजे किंमत ५,६१० रुपये असा एकुण १,०२,५५,६१० रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने त्याचे विरूध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपीस मा. न्यायालयाने त्यास दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. गुन्हयाचा पुढील तपास उलवे पोलीस ठाणे करीत आहे. गुन्हयात आरोपी सोबत इतर कोणी साथीदार आहेत का व आरोपीने सदरचा अमली पदार्थ कोठुन प्राप्त केला याचा शोध गुन्हे शाखादेखील करीत आहे. आरोपीवर यापुर्वी नवघर पोलीस ठाणे, मुंबई शहर येथे गुन्हा दाखल आहे.

कारवाईमध्ये अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, सहाय्यक निरीक्षक अलका पाटील, उपनिरीक्षक शरद भरगुडे, हवालदार धोनसेकर, शिपाई ठाकूर, चव्हाण, पारासुर, कोलते, पाटील व चालक पोहवा हांडे हे सहभागी झाले होते.

# उदय जोशी सेवानिवृत्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वाशिवली येथील डॉ.पारनेरकर विद्यालयातील शिक्षक उदय वसंत जोशी हे सेवानिवृत्त झाल्याने विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले. विद्यार्थ्यांनीच जोशी सर यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सेवानिवृत्त जोशी सर व त्यांच्या पत्नी अश्विनी उदय जोशी यांच्याहस्ते केक कापून विद्यार्थ्यांशी त्यांना केक भरविला. या वेळी आपलाच कोणीतरी आपणास सोडून दूरवर जात असल्याने विद्यार्थ्यांच्या डोळ्यात अश्रु अनावर झाले. सेवानिवृत्त शिक्षक उदय वसंत जोशी यांनी ३० वर्षे वाशिवली येथील डॉ. पारनेरकर विद्यालयात सेवा बजावली. त्यांचा स्वभाव व वागणे विद्यार्थ्यांशी जुलत असल्याने ते विद्यार्थ्यांचे आवडते शिक्षक होते.

तीस वर्षांनंतर सेवानिवृत्त झाल्याने उदय जोशी सरांसारखा शिक्षक होणे नाही, अशी प्रतिक्रीया विद्यार्थ्यांनी बोलताना दिली.

# वीर वाजेकर महाविद्यालयात कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

नवीन शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान प्रणाली या विषयाचा समावेश असल्याकारणाने विद्यार्थ्यांना विषयाची व्याप्ती कळावी यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कीर्ती कॉलेजमधील अतिथी संसाधन व्यक्ती जान्हवी कोलते यांनी चार सर्वसमावेशक मॉड्युलद्वारे प्रमुख सहभागींना अभ्यासपूर्ण व्याख्याने दिली.

पहिल्या मॉड्यूलने भारताच्या इतिहासलेखनाचा शोध लावला, भारतीय सभ्यतेच्या प्राचीनतेबद्दलच्या विद्यमान कथनांना आव्हान दिले आणि सुधारित दृष्टीकोन आवश्यक असलेले बहु-अनुशासनात्मक पुरावे सादर केले. दुसरे मॉड्यूल इंडियन नॉलेज सिस्टीम्स (IKS)च्या ज्ञानशास्त्रामध्ये शोधले गेले, त्याची तुलना इजिप्शियन, मेसोपोटेमियन, ग्रीक, रोमन आणि चिनी लोकांसह इतर प्राचीन संस्कृतींच्या ज्ञानशास्त्राशी केली गेली. तिसऱ्या आणि चौथ्या मॉड्युलमध्ये खघड चा जागतिक प्रभाव आणि त्यानंतरची घसरण तपासली.

संपूर्ण सत्रात, कार्यशाळेने भारताचा सखोल ऐतिहासिक आणि बौद्धिक वारसा समजून घेण्यासाठी पुराव्यावर आधारित कथनावर भर दिला, IKSमधील प्रगती आणि समकालीन काळातील त्याची प्रासंगिकता यावर प्रकाश टाकला. उत्साही सहभागासह, कार्यशाळेत १५० विद्यार्थी आणि सर्व प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

पंकज भोये यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, डॉ. गुरुमीत सी. वाधवा निमंत्रक म्हणून आणि अर्जुन पाटील संघटक सचिव म्हणून काम करत होते. आभार प्रा. यशवंत गायकवाड यांनी मानले.

# महापुरुषांना अभिवादन करून गृहप्रवेश



## समाजात निर्माण केला आदर्श

**उरण : बातमीदार**

हेच आमचे गुरु इथूनच आमचे अस्तित्व सुरु असे ब्रीद वाक्य उराशी बाळगून स्वर्गीय जनाबाई मारुती नागु म्हात्रे यांचे नातू सामाजिक कार्यकर्ते समीर रामचंद्र म्हात्रे (रा.पागोटे-उरण) यांच्या नवीन घराचे गृह प्रवेश महापुरुषांना विनम्र अभिवादन करून करण्यात आले.

यावेळी सर्व मान्यवर, नातेवाईक, मित्र परिवार सहकुटुंब उपस्थित होते. व सर्वांनी समीर म्हात्रे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आज अनेक ठिकाणी विविध धार्मिक विधी करून गृह प्रवेश केला जातो, पण समीर म्हात्रे हे पुरोगामी विचाराचे असल्याने त्यांनी आधुनिक युगाचा विचार करत, समाजात प्रबोधन करण्याच्या दृष्टीकोणातून महापुरुषांना अभिवादन करत गृह प्रवेश केला. त्यांच्या या गृह प्रवेशाची सर्वत्र चर्चा होत आहे. एक चांगला धाडसी व उत्तम निर्णय घेतल्याने समीर म्हात्रे यांच्या निर्णयाचे, कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आदिवासी वस्तीत अनोखी दिवाळी



**नवी मुंबई : बातमीदार**

समाजसेवेची प्रतिज्ञा घेऊन ठाण्यातील दोन अभियंता मित्र तुषार पाटील आणि आशिष नाईक यांनी स्थापन केलेल्या आर्य धाम ट्रस्ट आणि हक तुझ्या साथ आमची संस्थेच्या माध्यमातून जव्हारच्या विविध आदिवासी वस्त्यांमध्ये अनोखी दिवाळी साजरी करण्यात आली.

तेथील कुटुंबांना दिवाळीचे साहित्य, साड्या, कपडे, दिवे, आंघोळीचे साबण, तेल, खाद्यपदार्थ आणि लहान मुलांसाठी खेळणी यांचे वाटप करण्यात आले. लहान मुलांसह फटाके उडवून आणि महिलांसोबत पारंपरिक आदिवासी नृत्य करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. तसेच रांगोळी स्पर्धा, किल्ला स्पर्धा, क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक गृहोपयोगी वस्तू बक्षीस म्हणून देण्यात आल्या. लहान मुलांना खेळणी, कपडे मिळताच त्यांनी एकच गलका केला होता. हे दृश्य पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणणारे ठरले.

दरम्यान, आर्य धाम ट्रस्ट आणि हक तुझ्या साथ आमची संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात.

# नवी मुंबईत हास्य काव्यसंध्येला प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई प्रेस क्लब ने एक अनोखे पण लोकप्रिय जेष्ठ कवींच्या हास्य संध्येचे आयोजन मंगळवारी (दि. २९) वाशीत केले होते.



विडंबन, हास्य कविता व खुर्चीला मध्य समजून मारलेल्या गप्पांमुळे व मार्मिक, खुसखुशीत भाष्यामुळे कार्यक्रम नवी मुंबईकरांची दाद मिळवून गेला. सूत्रसंचालन महेश केळुसकरांनी हास्य चौकार व षटकारांनी केले.

मिर्झा बेग हे महाराष्ट्राला जांगडगुट्टा व मिर्झा एक्सप्रेसमुळे परिचित आहेतच. वऱ्हाडी भाषेतील कवितेने करुन समयोजित किस्से, विनोद सांगून काव्यसंध्येला सुरुवात केली.

ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे यांनी कसदार खेळाडूसारखे विडंबनाचे फटके मारून तथा पूर्वीच्या त्यांच्या विडंबन कविता आजही किती समायोचित वाटतात हे दाखवून देत आता कवी म्हणून थांबावस वाटते ही खंत बोलून दाखवली.

श्रीकांत बोजेवार हे त्यांच्या तंबीदुराई स्तंभ लेखनामुळे प्रसिद्ध आहेतच पण आजच्या सद्यपरिस्थितीला त्यांनी काव्यातून घेतलेले चिमटे लाजवाबच होते. तर महेश केळुसकरांनी त्यांचीच एक कविता नेत्यांच्या बायकांचे उखाणे अशी काही पेश केली की टाळ्यांच्या कडकडाटाने विष्णुदास भावे सभागृह दणदणून गेले.

केळुसकरांनी राजकीय व्यंग कविता सादर केल्या. या हास्य संध्येला नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. केलास शिंदे आदी उपस्थित होते. तर नवी मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज जालनावाला यांनी प्रास्ताविक केले.

नवी मुंबईतील ज्येष्ठ, श्रेष्ठ नागरिक, समाजसेवक, कवितेवर प्रेम करणारे रसिक यांना नवी मुंबई प्रेस क्लबने दीपावलीची ही खास भेट दिली. दीपावलीनिमित्त नवी मुंबई प्रेस क्लबने अविस्मरणीय संध्या दिल्याबद्दल रसिकांनी मनमुराद दात देत धन्यवाद दिले.

# मतदान जागरूकतापर शपथविधी कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका २०२४च्या अनुषंगाने मतदान जागरुकता निर्माण करण्यासाठी शनिवारी (दि.२६) बार्न्स कॉलेज ऑफ ए.एस.सी. पनवेल यांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता निर्माण करणे आणि जास्तीत जास्त मतदानासाठी प्रेरित करणे होता. प्रास्ताविक प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकत आपल्या सभोवतालच्या नागरिकांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. युवा मतदारांचा सहभाग लोकशाहीला बळ देतो, असे त्यांनी सांगितले.

या वेळी विद्यार्थ्यांना साक्षी भागवत हिने मतदानाची शपथ दिली. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात जबाबदारीची भावना निर्माण झाली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अधिकारी प्रा. चंद्रकांत मुकादम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आभार व्यक्त केले. कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सहभागाने यशस्वी झाला.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत दिवाळी

**नवी मुंबई : बातमीदार**

सर्व प्रकारच्या दिव्यांगांना सक्षम करणारे केंद्र म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेचे ईटीसी दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र संपूर्ण देशभरात नावाजले जात असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी ईटीसी केंद्राला दिवाळी सणानिमित्त भेट देत दिव्यांग विद्यार्थी व व्यक्तींसमवेत दिवाळी साजरी केली.



या वेळी त्यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, ईटीसी केंद्र संचालक तथा उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, वाशी विभागाचे सहाय्यक आयुक्त सागर मोरे व केंद्राच्या प्रमुख व विशेष शिक्षक आणि पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

या वेळी आयुक्तांनी व उपस्थित मान्यवरांनी दिव्यांग विद्यार्थी व व्यक्तींना फराळ देत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी व पालकांशी सुसंवाद साधतांना आयुक्तांनी दिव्यांगांना मदतीचा हात देत सक्षम करण्याची जबाबदारी ही प्रशासन, विशेष शिक्षक व पालक अशी सर्वांचीच असल्याचे सांगत एकत्र येवुन अधिक चांगले कल्याणकारी काम जबाबदारीने करुया असे सांगितले. दिव्यांग मुलांचे पालक हे देखील विशेष शिक्षक असल्याचे नमूंद करीत आयुक्तांनी ईटीसी केंद्रात मुलांसमवेत येणाऱ्या पालकांसाठीही विशेष उपक्रम राबवावेत, असे निर्देर्शित केले. तंत्रज्ञानात झपाट्याने बदल होत असून दिव्यांगांसाठीच्या अद्ययावत उपचार पध्दतींचा समावेश ईटीसी केंद्रात करावा असेही आयुक्तांनी सूचित केले.

आयुक्तांनी दिव्यांग मुलांसोबत दिवाळी साजरी करण्याचा राबविलेला उपक्रम दिलासा देणारा असल्याचे पालकांनी सांगितले.

## निवडक

### चणेऱ्यातील ग्रामस्थांना मिठाई वाटप



**धाटाव :** आपल्या सभोवतालच्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, याच समाजातील गरीब घटकांसाठी सामाजिक कार्यकर्ते मिलिंद झुरे यांनी चणेरा विभागातील न्हावे, नवखार, सोनखार या गावातील ६०० कुटुंबियांना घरोघरी जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी गोड केली. यामध्ये उटणे, मिठाई यांसारख्या अनेक साहित्याच्या वाटप केल्यामुळे प्रत्येकाच्या घरोघरी आनंदाचे वातावरण पसरले आहे. अशा उपक्रमामुळे सामाजिक जाणीवेची भावना आमच्या युवकांमध्ये जागृत करण्याचे काम मी गेले वर्षांमध्ये प्रामाणिकपणे करीत असल्याचे मिलिंद झुरे यांनी भावना या वेळी व्यक्त केली.

### महिला बचत गटांना धनादेश सुपूर्द



**माणगाव :** नागरिक सेवा फाउंडेशनच्या वतीने दिवाळी निमित्ताने विविध महिला बचत गटांना मदतीचा हात देऊन आर्थिक मदत करण्यात आली. माणगावचे पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप जठार, नागरिक सेवा फाउंडेशनचे संस्थापक दीपक देशमुख, सुशील कदम, संजय गांधी,अध्यक्ष रत्नदीप आंबरे, सचिव भालचंद्र खाडे, सहसचिव अजित शेडगे, गणेश गोरेगावकर, पुंडलिक मालोरे, रुपेश वाढवल, काशिनाथ गाणेकर आदींच्या उपस्थितीत बचत गटातील महिलांना धनादेश सुपूर्द करण्यात आला. ऐन दिवाळी हंगामात दिवाळी फराळ बनविण्यासाठी रोख रक्कम प्राप्त झाल्याबद्दल बचत गटांनी नागरिक सेवा फाउंडेशनचे आभार व्यक्त केले.



**मुरुड : श्री दत्त मंदिर ट्रस्टच्या वतीने दरवर्षी दिवाळी निमित्ताने चित्रकला स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो. कोळीवाडा परिसरात वास्तव्य करणारा चित्रकार समर्थ चंद्रकांत बळी हा एकाग्रपणे श्री दत्त मंदिराचे चित्र पूर्ण करताना दिसत आहे.** (छाया : संजय करडे)

# अलिबागमध्ये निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## निरीक्षक रुही खान यांनी घेतला आढावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरळीत पार पाडणेकामी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक निरिक्षक यांची नेमणूक केली जाते. १९२ अलिबाग विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक निरिक्षक सर्वसाधारण म्हणून रुही खान यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निवडणूक निरिक्षकांनी १९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या उमेवारी अर्ज छाननीवेळी उपस्थित राहून प्रक्रियेचे निरीक्षण केले.



सदर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निरिक्षकांनी १९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीकरीता नगर परिषद, अलिबाग येथील इमारतीमध्ये स्थापित करण्यात आलेल्या निवडणूक नियंत्रण कक्षास भेट दिली व तेथील कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर उपस्थित कर्मचारी व पदाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचनाही त्यांनी या वेळी दिल्या.

अलिबाग विधानसभा मतदार संघातील मतदान यंत्र ठेवण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या जिल्हा क्रिडा संकुल, नेहूली, अलिबाग या ठिकाण भेट दिली. सदर ठिकाणी करण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणा तसेच नियोजनाची पाहणी करून निवडणूक निरीक्षक रुही खान यांनी त्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी प्रक्रिया २३ नोव्हेंबर रोजी पार पाडण्याकरीता जिल्हा क्रिडा संकुल, नेहूली, अलिबाग हे ठिकाण निश्चित करण्यात आलेले आहे. निवडणूक निरिक्षकांनी सदर ठिकाणी भेट देऊन मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती घेऊन, आवश्यक त्या सूचना दिल्या.

उमेदवारांच्या खर्चावर नियंत्रण व आचारसंहितेचे उल्लंघन रोखण्याकरीता निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे खर्च नियंत्रण पथकांची निर्मिती करण्यात आली आहे, तसेच जनसामान्यांना याबद्दल तक्रारी करता याव्या म्हणून सी-व्हिजील सिटीझन ॲप कार्यरत आहे. हे सी-व्हीजील सीटीझन ॲप आपणास प्लेस्टोअरवर उपलब्ध आहे.

अलिबाग मतदारसंघामध्ये एकूण १४ भरारी पथके, चार स्थिर सर्वेक्षण पथक केंद्र, एक आचारसंहीता पथक कार्यरत आहेत. सदर पथकांच्या माध्यमातून उमेदवारांच्या खर्चावर, आचारसंहीता उल्लंघन, बेकायदेशीर कामकाज यावर लक्ष ठेवण्यात येत आहे. आचारसंहिता उल्लंघन चौकशी करण्याकरीता आचारसंहिता पथके कार्यरत आहेत. जनसामान्यांना तक्रार करता यावी, याकरीता २४ तास नियंत्रण कक्ष उपलब्ध करून देण्यात आले आहे. या नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी (०२४१२२२०४२) असा आहे.

# नागरिकांनी मतदानरूपी आशीर्वाद द्या

## ना. आदिती तटकरे यांचे महागाववासियांना आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीला मी सामोरे जात असून मला मतदानरुपी आशीर्वाद आपण सर्वांनी द्या, असे आवाहन महायुतीच्या उमेदवार तथा राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी महागाव वासियांना केले.



श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाची निवडणूक होत असून या निवडणुकीच्या अनुषंगाने आदिती तटकरे यांनी मतदारसंघात गाव बैठकांवर जोर देऊन मतदारांशी संवाद साधत आहेत. या मतदारसंघातील तळा तालुक्यातील महागाव जिल्हा परिषद गटात बुधवारी (दि.३०) ना. आदिती तटकरे यांनी गावबैठका घेतल्या. त्या वेळी त्या बालत होत्या.

या बैठकीला सामाजिक कार्यकर्ते ॲड. उत्तम जाधव, नगराध्यक्ष माधवी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, माजी राजिपच्या समाजकल्याण सभापती गीता जाधव, तळा राष्ट्रवादी अध्यक्ष नाना भौड, तालुका प्रमुख ठसाल, कमलाकर पाटील, तळा, माजी सभापती अक्षरा कदम, विठोबा साबळे, जान्हवी शिंदे, बबन भौड आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी ना. आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, या सर्व विभागात जी विकासकामे झाली आहेत ती तटकरे साहेबांच्या माध्यमातून झाली आहेत. मध्यंतरीच्या काळात अनिकेत तटकरे आमदार झाल्यावर त्यांनी व २०१९मध्ये मी श्रीवर्धनची आमदार झाल्यावर आम्हीदेखील विकासकामे केली. या गावातील रस्ते, सभा मंडपे, जलजीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाण्याची योजना, समाज मंदिरे, सभागृहे अशी विविध विकासकामे केली. त्याचबरोबर आमच्या महायुतीच्या सरकारने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली वैयक्तिक लाभाच्या योजना देखील राबविल्या. यासाठी श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातून तुमचे प्रतिनिधित्व करण्याची संधी पुन्हा एकदा मला मिळाली. या करीत आपण सर्वांनी येत्या २० नोव्हेंबरला घड्याळ या निशाणी समोरील बटन दाबून मला मतदानरुपी आशीर्वाद देऊन तुमची सेवा करण्याची संधी द्यावी, असे त्या म्हणाल्या.

या वेळी महागाव आदीवासीवाडी, विनवली, बहुलेवाडी आदी विविध ठिकाणी आदिती तटकरे यांच्या गाव बैठक उत्साहात झाल्या.

# निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ॲप विकसित

**रायगड :** विधानसभा निवडणुकीत विविध विषयांची प्रभावी अंमलबजावणीकरीता यावी व त्यावर नियंत्रण ठेवता यावे या हेतूने भारत निवडणूक आयोगाने आयटी ॲप्लिकेशन्स विकसित केले आहेत. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यासाठी निवडणूक आयोगाने सी- व्हिजील मोबाईल ॲप विकसित केले आहे. यामध्ये दक्ष नागरिकांना एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या प्रसंगाचे सदर ॲपमध्ये छायाचित्र अथवा व्हिडीओ काढून तक्रार नोंदविता येणार आहे व त्यावर जिल्हा प्रशासन तसेच मुख्य निवडणूक कार्यालयाकडून तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे.

पात्र दिव्यांगांना मतदार नोंदणी करणे, मतदान केंद्राचा शोध घेणे, व्हिलचेअरची मागणी नोंदविणे इ. सोयी उपलब्ध करून घेण्यासाठी सक्षम ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मतदारांना त्यांच्या उमेदवाराबाबतचा तपशील त्यामध्ये त्यांच्या नावे असलेले गुन्ह्यांचा तपशील, उमेदवाराची माहिती, इ. माहिती केवायसी ॲप पाहता येऊ शकते.

निवडणूक अधिक मुक्त व निष्पक्ष वातावरणामध्ये व्हावी यासाठी आचारसंहितेच्या कालावधीत राज्यातील विविध केंद्रशासनाच्या व राज्यशासनाच्या अंमलबजावणी यंत्रणांकडून बेकायदेशीर पैसा, दारू, अंमली पदार्थ व भेटवस्तू, मौल्यवान धातू, इ. गोष्टी जप्त करण्यात येणार आहे. या जप्तीची माहिती भारत निवडणूक आयोगास दरदिवशी ईएसएमएस ॲपवरून कळविण्यात येत आहे.

# मुरूडमध्ये भातपिक कापणी हंगामाला प्रारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने आता पूर्णपणे विश्रांती घेतल्यानंतर ऐन दिवाळीच्या तोंडावर भातपिक कापणीला प्रारंभ करण्यात आला आहे. वरकस वा उखारु जमिनीवरचे हळवे भात कापणीला आले असतानाही परतीच्या पावसाने ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवडा अखेर हजेरी लावल्याने काही प्रमाणात भात आडवे होऊन नुकसान झाले आहे.



तालुक्यात ३९०० हेक्टर क्षेत्र भातलागवड असले तरी यंदा ३८९० हेक्टर क्षेत्रात लागवड झाल्याची माहिती कृषी विभागाने दिली. यंदा जूनमध्ये पावसाने ओढ दिल्याने पेरण्या खोळंबल्या असल्या तरी जुलैमध्ये हा अनुशेष भरून काढल्याने भातपिकास पोषक पर्जन्य मिळाले. परिणामी भातपिक जोमदार वाढल्याने बळीराजा आनंदात आहे. भातपिक तयार झाल्यानंतर परतीच्या पावसाने काही ठिकाणी जोरदार हजेरी लावल्याने पीक आडवे झाले.

मुरुड तालुक्यात केवळ ११७७ शेतकऱ्यांनी पीक विमा काढला असून चोला मंडळ जनरल इन्शुरन्स कंपनीने काढणीपश्चात भाताचे नुकसान झाल्यास विम्याचे संरक्षण देण्याचे जाहीर केल्याने या प्रकारात येथील शेतकरी बसत नाहीत. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

# आशियाई परिषदेत अभिजित पाटील करणार प्रतिनिधीत्व

**अलिबाग : प्रतिनिधी**

तैवानमध्ये होणाऱ्या कलरॉक एक्सपोजर प्रोग्राम-२०२४ या सहकार परिषदेसाठी भारताचे प्रतिनिधी म्हणून अलिबागमधील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित सुरेश पाटील व समता पतसंस्था, कोपरगावचे सीईओ सचिन भट्टड यांची निवड करण्यात आली आहे. तैवानमधील तयाचुंग शहरात ४ ते ८ नोव्हेंबर या कालावाधीत ही परिषद होणार आहे.



आशिया खंडातील ज्या २० देशांमध्ये सहकारी पतसंस्था चालतात त्या देशांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होणार आहेत. पतसंस्थांसमोर कोणत्या अडचणी आहेत. त्याचा सामना करून स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागणार आहेत, सभासदांच्या हितासाठी काय करावे लागेल यावर चर्चा होणार आहे. पहिल्या दिवशी भारतातील पतसंस्थांबात माहिती देण्याची संधी अभिजित पाटील यांना मिळणार आहे.

# ‘स्पंदन’च्या दिवाळी पहाटने जिंकली रसिकांची मने

**रोहे : प्रतिनिधी**

स्पंदन नाट्य संस्थेच्या वतीने रोह्यातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात स्वरगंध मराठी गाण्याचा सुमधूर दिवाळी पहाट या कार्यक्रमाने रसिकांची मने जिंकली.



जनाईच्या ओव्यांपासून ते भूपाळी, विठू नामाचा गजर, संगीत नाटकातील गीताने दिवाळी पहाट या संगीतमय गीतांनी रसिकांना भुरळ घातली. स्पंदन नाट्य संस्थेच्या स्नेहा अंब्रे यांच्या संकल्पनेतून प्रतीक राक्षे, राहुल घोंडीदे यांच्या संगीत संयोजनातून स्वरगंध दिवाळी पहाट रोहेकरांना संगीतमय मेजवानी ठरले. निवेदिका विद्या घोडिंदे यांनी या संगीतमय दिवाळी पहाटमध्ये जान भरली.

या वेळी ज्येष्ठ नेते व्ही.टी. देशमुख, रावसाहेब सरफळे, डॉ अशोक जाधव, माजी नगराध्यक्ष रत्नप्रभा काफरे, गजानन मळेकर, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, मयुर दिवेकर, सकल मराठा अध्यक्ष अप्पा देशमुख, सुरेश मोरे, नंदकिशोर राक्षे, रमेश विचारे, मिलन शहा, कुलदीप वेदपाठक, अमित गुजर यांसह रसिक, उपस्थित होते.

स्थानिक कलाकार सृष्टी बद्रिके, विशाल दंडगव्हाळ, राकेश कागडा, ऋतुजा घोंडीदे, वैभव टोपले, सृष्टी बद्रिके, यश वेदपाठक, श्रावणी यांनी बहारदार गीते सादर केली. या वेळी प्रसिद्ध डॉ. अशोक जाधव यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्वांचे आभार अध्यक्ष स्नेहा अंब्रे यांनी मानले.

# लक्ष्मीपूजनासाठी झेंडूच्या फुलांची मोठी आवक

## ◆ मागणी वाढल्याने भाव वधारला; तरीही गर्दी कायम

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाने उघडीप दिल्याने बाजारात झेंडूच्या फलांची मोठी आवक झाली आहे. लक्ष्मीपूजनासाठी झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व आहे. त्यामुळे दसऱ्यानंतर आता दिवाळीच्या सणातही झेंडू चांगलाच भाव खाताना पहायला मिळत आहे. झेंडूबरोबरच शेवंतीच्या फुलांनाही बाजारात चांगली मागणी आहे.



मागील आठवडयात परतीच्या पावसाने विश्रांती घेतल्याने झेंडूची फुले कुजण्याचा धोका राहिला नाही. त्यामुळे व्यापारी मोठ्या प्रमाणात फुलांची मागणी नोंदवत आहेत. नागरिकांच्या खिशाला मात्र ऐन दिवाळीत कात्री लागली आहे. सध्या अलिबागच्या बाजारात कमी प्रतीचा झेंडू १०० ते १२० रुपये, तर आकाराने मोठा आणि उत्तम प्रतीचा झेंडू २०० ते २५० रुपये किलोने विकला जात आहे.

दिवाळीत लक्ष्मीपुजनाच्या दिवशी दारावर झेंडूच्या फुलांचे तोरण, दुकानांची सजावट, करण्याची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या वेळी मोठ्या प्रमाणात झेंडूच्या फुलांचा वापर केला जातो. त्यामुळे दिवाळीच्या दिवसात झेंडूच्या फुलांना विशेष मागणी असते.

केवळ घरालाच नाही तर दुकाने, व्यापारी आस्थापना या ठिकाणी दारावर झेंडूची तोरणे लावली जातात, तसेच पुजेसाठ देखील झेंडुच्या फुलांचाच वापर केला जातो.

**“ फुलांच्या वाढत्या किमतीमुळे तीन ते चार किलो फुले खरेदी करणारे ग्राहक आता अर्धा किलो, एक किलो खरेदी करीत आहेत. लक्ष्मीपूजनानंतर फुलांची कमतरता जाणवेल आणि भाव वाढतील.**

**–रमेश पाटील, विक्रेता**

### ✻ व्यापारी तेजीत ✻

***दिवाळीनिमित्त बाजार झेंडूच्या फुलांनी बहरला असला तरी झेंडूच्या दराने चांगलीच उसळी घेतली आहे. गेल्या आठवड्यात ४० ते ६० रुपये दराने विकल्या जाणाऱ्या झेंडूचे दर तब्बल दोन ते तीन पटीने वाढले आहेत. एपीएमसीत कमी प्रतीचा झेंडू १०० ते १२० रुपये किलोने विकला जात असून आकाराने मोठा आणि उत्तम प्रतीचा झेंडू २०० ते २५० रुपये किलोने विकला जात आहे. मोठमोठी आस्थापने, हॉटेल्स, दुकाने, वाहने, घर सजावटीसाठी मोठ्या प्रमाणावर झेंडू आणि इतर फुले खरेदी केली जात असल्याने व्यापाऱ्यांना फायदा होत आहे.***

# छत्रपती शिवाजी मंडळातर्फे रंगावली प्रदर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील पाटील आळीमध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी मंडळातर्फे रंगावली प्रदर्शनाचा शुभारंभ करण्यात आला आहे. हे प्रदर्शन ३ नोव्हेंबरपर्यंत पाहण्यासाठी खुले आहे.

मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी मंडळाचे माजी अध्यक्ष अशोक शिंदे, दत्तात्रय म्हसे, प्रदीप तथा बाळा देशमुख, हरिश्चंद्र राऊत आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत गजानन गुरव यांनी केले.







या प्रदर्शनात चित्रकार सुनील परदेशी यांनी इंदिरा गांधी, किसन खंडोरी यांनी जोगवा, राजेंद्र दगडे यांनी रतन टाटा, सविता शेलवले यांनी आनंद दिघे, आलिशा जैन यांनी सूर्यकुमार यादव, मनोज चव्हाण यांनी रश्मिका मंदाना, प्रदीप घाडगे यांनी मनोज जरांगे, कुणाल साळवी यांनी अतुल परचुरे, प्रियांका भासे यांनी रोहित शर्मा, आशिष गायकवाड यांनी अल्लू अर्जुन, अमित कांबळे यांनी राज कुमार यांची रांगोळी साकारली असून नवोदित कलाकारांनीही विविध विषयावरील रांगोळ्या साकारून प्रदर्शनात जिवंत पणा आणला आहे. ५०व्या वर्षानिमित्त केक कापण्यात आला. या वेळी तन्हा परदेशी, मनोज देशमुख, मानसी सुळे, वैदेही दगडे, गौरी चव्हाण, शर्वरी भोसले, सलोनी जैन, गार्गी साळुंखे, शुभम पॉल आदी नवोदित कलाकार उपस्थित होते.

# भारतीय महिला टीमचा न्यूझीलंडला दणका

## शानदार विजयासह मालिका खिशात

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने न्यूझीलंडविरूद्धच्या वनडे मालिकेत शानदार खेळ करून दाखवला आहे. मालिकेतील तिसऱ्या वनडे सामन्यात भारतीय महिला संघाने सहा गडी राखून विजय मिळवला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात भारतीय महिला खेळाडूंनी दमदार कामगिरी केली.

या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडला हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. न्यूझीलंडला सुरुवातीलाच मोठे धक्के बसले, मात्र त्यानंतर ब्रुक हॉलिडेने ८६ धावांची शानदार खेळी करीत संघाला मजबूत स्थितीत पोहचवले. न्यूझीलंडने या डावात २३२ धावांपर्यंत मजल मारली. भारताकडून गोलंदाजी करताना दिप्ती शर्माने तीन तर



प्रिया शर्माने दोन गडी बाद केले.

या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौर आणि स्म्रिती मंधानाच्या फलंदाजीची जादू पाहायला मिळाली. स्म्रिती मंधानाने १२२ चेंडूंचा सामना करत शानदार शतकी खेळी केली. तिला साथ देत हरमनप्रीत कौरनेदेखील शानदार अर्धशतकी खेळी केली. तिने ५९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. हा सामना जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावणारी स्म्रिती मंधाना या सामन्याची हिरो ठरली. या शानदार कामगिरीच्या बळावर तिची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली. यांसह भारताने ही मालिकादेखील जिंकली.

**संक्षिप्त धावफलक :** भारतीय महिला ४४.२ षटकांत ४ बाद २३६ : स्मृती मानधना १०० (१२२ चेंडूत १० चौकार), शेफाली वर्मा ११ चेंडूत १२, यास्तिका भाटिया ३५ (४९ चेंडूत ४ चौकार), हरमनप्रीत नाबाद ५९ (६३ चेंडूत ६ चौकार), जेमिमा रॉड्रिग्स २२ (१८ चेंडूत ४ चौकार), हसबनीस नाबाद ०, अवांतर ८ हन्नाह रो २-४५, डिव्हाईन १-४४, फ्रान जोनास १-५०.

न्यूझीलंड महिला ४९.५ षटकांत सर्व बाद २३२ : हॅलिडे ८६ (९६ चेंडूत ९ चौकार, ३ षटकार), प्लिम ३९ (६७ चेंडूत ६ चौकार), गेझ २५ (४९ चेंडूत १ चौकार), ताहुहू नाबाद २४ (१४ चेंडूत २ चौकार, १ षटकार), मॅडी ग्रीन १५ (१९ चेंडूत २ चौकार), अवांतर १४. दीप्ती शर्मा ३-३९, प्रिया मिश्रा २-४१, सायमा ठाकुर १-४४, रेणुका सिंग १-४९.

# हरियाणा स्टीलर्सचा यूपी योद्धांवर शानदार विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगच्या २६व्या सामन्यात हरियाणा स्टीलर्सने २८-३० अशा गुणांसह यूपी योद्धांवर शानदार विजय मिळाविला. हैदराबादच्या गचिबोवली येथील जीएमसीबी इनडोअर स्टेडियमवर बुधवारी झालेल्या लढतीत विनय, संजय आणि शिवम पटारे यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या हरियाणा स्टीलर्सने यूपी योद्धांना ३०-२८च्या स्कोअरलाइनने पराभूत केले.

दोन्ही संघांची सुरुवात संथ गतीने होत असताना, सुरुवातीचा फायदा हरयाणा स्टीलर्सने केला. नेहमीप्रमाणे हरियाणा स्टीलर्स बचावात भक्कम होते आणि यूपी योद्धाहून सरस होते.

पहिल्या हाफमध्यक हरियाणा स्टीलर्सने ५-१ने आघाडी घेतली, तथापि भारतच्या सुपर रेडने पहिल्या हाफमध्ये ९ मिनिटे बाकी असताना यूपी योद्धा पुढे केले. तेव्हापासून हरियाणा स्टीलर्सने डिफेंडर संजयने लवकर हाय ५ मिळवून खेळावर नियंत्रण मिळवले, ज्यामुळे त्याच्या बाजूने आघाडी घेण्यास मदत झाली. हाफ टाइम ब्रेकला हरियाणा स्टीलर्सने ११-९ अशी स्कोअरलाइन आघाडीवर ठेवली. ब्रेकनंतर यूपी योद्धांच्या भवानी राजपूतने पहिल्या काही मिनिटांत



झटपट छापे टाकून त्याच्या बाजूने लढा दिला. विनय, नवीन आणि संजय यांनी मजबूत वैयक्तिक कामगिरी करीत राहिल्याने हरियाणा स्टीलर्सने लगेचच माघारी परतले. सामना अर्ध्या तासापर्यंत पोहोचला असताना हरियाणा स्टीलर्स बॉक्स सीटवर कायम राहिली. शेवटच्या १० मिनिटांमध्ये, विनय त्याच्या सुपर १०च्या जवळ पोहचला होता आणि फक्त ५ मिनिटे बाकी असताना, मोहम्मदरेझा शादलौईने यूपी योद्धास ऑलआऊट केले.

खेळाच्या अंतिम टप्प्यात, यूपी योद्धसने गगन गौडामध्ये ट्रम्प कार्ड काढले, ज्याने झटपट वेळेत ९ गुण मिळवून आपली बाजू पुन्हा स्पर्धेत आणली. २ मिनिटे बाकी असताना, हरियाणा स्टीलर्सने २ मिनिटे आघाडी घेतली. हरियाणा स्टीलर्सने निकराच्या लढतीत विजय मिळवला.

# इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सच्या घरी चोरी

**नवी दिल्ली :** इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स याच्या घरी मास्कधारी टोळीने घुसून चोरी



केल्याचे उघड झाले आहे. चोरांनी शिरकाव केला तेव्हा त्याची पत्नी आणि दोन मुले घरातच होते. स्टोक्स त्या वेळी पाकिस्तानात होता.

चोरांनी कुटुंबीयांनी कोणताही त्रास दिला नसल्याचे स्टोक्सने सांगितले पण काही महत्त्वाच्या वस्तू चोरांनी लंपास केल्याचे त्याने सांगितले. चोरांनी लंपास केलेल्या वस्तूंसंदर्भात स्टोक्सने सोशल मीडिया अकाऊंटवरून माहिती दिली. २०२०मध्ये स्टोक्सला प्रतिष्ठेचा पुरस्कारही चोरट्यांनी लांबवला आहे. माझी बायको आणि मुले घरात असताना ही चोरी झाली हे खूपच वाईट होते असे स्टोक्सने म्हटले आहे. सुदैवाने त्यांना काही झाले नाही हे आमचे नशीब, असे त्याने सांगितले.

# आयपीएल २०२५साठी खेळाडूंची रिटेंशन यादी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५साठी चाहत्यांची उत्कंठा शिगेला पोहचली आहे, गुरुवारी (दि.३१) सर्व १० फ्रँचायझींनी रिटेन आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची घोषणा केली. चेन्नई सुपर किंग्जने नेहमीप्रमाणे त्यांचा स्टार खेळाडू एमएस धोनीला तर मुंबई इंडियन्सने रोहित शर्माला रिटेन ठेवले आहे. हे दोघे खेळाडू लिलावाचा भाग नसतील.

मुंबई इंडियन्स : मुंबईने पाचही कॅप्ड खेळाडूंना रिटेन ठेवले आहे. त्यांनी जसप्रीत बुमराहला १८ कोटी रुपयांमध्ये रिटेन ठेवले आहे. त्याच वेळी, सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्याला १६.३५ कोटींमध्ये कायम ठेवले आहे. मुंबईने रोहितला १६.३० कोटींमध्ये रिटेन केले आहे, तर तिलक वर्मा यांना ८ कोटी रुपयांमध्ये कायम ठेवले आहे.

चेन्नई सुपर किंग्स : चेन्नई सुपर किंग्सने ऋतुराज गायकवाड (१८ कोटी), मथिशा पाथिराना (१३ कोटी), शिवम दुबे (१२ कोटी), रवींद्र जडेजा (१८ कोटी) आणि महेंद्रसिंग धोनी (४ कोटी) यांना रिटेन ठेवले आहे. धोनीचा अनकॅप्ड खेळाडूच्या यादीत समावेश आहे.

सनरायझर्स हैदराबाद : सनरायझर्स हैदराबादने आपला कर्णधार पॅट कमिन्सला (१८ कोटी रुपये) रिटेन ठेवले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली एसआरएच संघ गेल्या मोसमात उपविजेता ठरला होता. कमिन्ससह, एसआरएचने अभिषेक शर्मा (१४ कोटी), हेनरिक क्लासेन (२३ कोटी), नितीश रेड्डी (६ कोटी) आणि ट्रॅव्हिस हेड (१४ कोटी) यांनाही रिटेन ठेवले आहे. दुसरीकडे, एसआरएचने आपला अनुभवी गोलंदाज भुवनेश्वर कुमारला



रिलीज केले आहे.

कोलकाता नाईट रायडर्स : कोलकाता नाइट रायडर्सने रिंकू सिंगला (१३ कोटी रुपये) रिटेन ठेवले आहे. यासोबतच वरुण चक्रवर्ती (१२ कोटी), सुनील नरेन (१२ कोटी), आंद्रे रसेल (१२ कोटी), हर्षित राणा (४ कोटी) आणि रमणदीप सिंग (४ कोटी) यांनाही रिटेन ठेवले आहे. २०२४च्या आयपीएलमध्ये संघाला चॅम्पियन बनवणाऱ्या कर्णधार श्रेयस अय्यरला फ्रँचायझीने रिलीज केले आहे. तो आता मेगा ऑक्शनमध्ये दिसेल.

राजस्थान रॉयल्स : राजस्थान रॉयल्सने त्यांचा कर्णधार संजू सॅमसनला (१८ कोटी रुपये) रिटेन ठेवले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने गेल्या हंगामात चांगली कामगिरी केली होती. सॅमसन व्यतिरिक्त, संघाने यशस्वी जैस्वाल (१८ कोटी), रियान पराग (१४ कोटी), शिमरॉन हेटमायर (११ कोटी), ध्रुव जुरेल (१४ कोटी) आणि संदीप शर्मा (४ कोटी) यांनाही रिटेन ठेवले आहे.

गुजरात टायटन्स : गुजरात टायटन्सने राशिद खानला (१८ कोटी रुपये) कायम ठेवले आहे. यासोबतच जीटीने शुभमन गिल (१६.५ कोटी) आणि साई सुदर्शन (८.५ कोटी) यांनाही रिटेन ठेवले आहे. राहुल तेवतिया (४ कोटी) आणि शाहरुख खान (४ कोटी)देखील संघासोबत राहतील. हे दोन्ही खेळाडू अनकॅप्ड खेळाडू म्हणून संघाशी जोडले गेले आहेत.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू : विराट कोहली पुन्हा एकदा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळताना दिसणार आहे. पहिल्या सत्रापासून आरसीबीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कोहलीला आरसीबीने कायम ठेवले आहे. त्याच्यासह यश दयाल आणि रजत पाटीदार यांनाही आरसीबीने कायम ठेवले आहे.

पंजाब किंग्ज : पंजाब किंग्जने शशांक सिंग (५.५ कोटी) आणि प्रभसिमरन सिंग (४ कोटी) यांना कायम ठेवले आहे. तर अर्शदीप सिंग, हर्षल पटेल, सॅम कुरान, जितेश शर्मा, कागिसो रबाडा, जॉनी बेअरस्टो आणि लियाम लिव्हिंगस्टोन यांसारख्या मोठ्या खेळाडूंना रिलीज केले आहे.

लखनौ सुपर जायंट्स : लखनौ सुपर जायंट्सने निकोलस पूरन (२१ कोटी) याला रिटेन ठेवले आहे. यासोबतच एलएसजीने रवी बिश्नोई (११ कोटी), मयंक यादव (११ कोटी), मोहसिन खान (४ कोटी) आणि आयुष बडोनी (४ कोटी रुपये) यांनाही रिटेन ठेवले आहे. केएल राहुलने फ्रँचायझीशी संबंध तोडले असून हा खेळाडू नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मेगा ऑक्शनमध्ये दिसणार आहे.

दिल्ली कॅपिटल्स : दिल्ली कॅपिटल्सने अक्षर पटेलला (१६.५ कोटी) रिटेन ठेवले आहे. यासह यादीत कुलदीप यादव (१३.२५ कोटी), ट्रिस्टन स्टब्स (१० कोटी) आणि अभिषेक पोरेल (४ कोटी) यांच्या नावाचा समावेश आहे. डीसीने सर्वांना चकित करीत ऋषभ पंतला रिलीज केले आहे. आता तो नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मेगा ऑक्शनमध्ये लिलावात दिसेल.













**पनवेल : विधानसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. प्रचारादरम्यान जागोजागी त्यांचे जोरदार स्वागत केले जात आहे. महिलांकडून त्यांचे औक्षण करून त्यांना शुभेच्छा आणि ज्येष्ठांकडून आशीर्वाद दिला जात आहे. दिवाळीच्या पहिल्याच दिवशी त्यांनी आरवली, बोराळे, भिंगारवाडी, भेर्ले, शेडुंग, सांगडे आदी भागात घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला.**









**कामासाठी मुलगा पाहिजे**

**अनुभव :-** MS-CIT, Tally कमीत कमी १ वर्षे अनुभव
**पत्ता :-** श्री.गणेश टेड्रर्स गाळा नं ४७-५० मार्केट यार्ड पनवेल
**मो.नं :-** ८६८९८९३७१५ ९०२९३३९९९९

**Salary: 15000 ते 18000**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com